नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २०८ * * अमरावती * शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## लखनऊमध्ये विमानाचे आपत्कालीन लँडिंग

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
उत्तर प्रदेशातील लखनऊ विमानतळावरून सौदी अरेबियाला जाणाऱ्या एका विमानाचे शुक्रवारी आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. उड्डाणानंतर काही वेळाने विमानात तांत्रिक बिघाड झाला होता.

सूत्रांनुसार, जेव्हा विमान मुंबईजवळ पोहोचले, तेव्हा केबिन प्रेशरमध्ये समस्या निर्माण झाली. यामुळे काही प्रवाशांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. परिस्थिती पाहून पायलटने आधी मुंबई विमानतळाशी संपर्क साधून लँडिंगची परवानगी मागितली, परंतु तिथून परवानगी मिळाली नाही. यानंतर पायलटने लखनऊ विमानतळाशी संपर्क साधला. लखनऊहून आपत्कालीन लँडिंगची परवानगी मिळताच विमान परत आले.

## काँग्रेसचा चंद्रपूरी तिढा




काँग्रेस पक्षासाठी महाराष्ट्रामधील चंद्रपुरातील नगरपालिकेत सत्ता स्थापनेचा क्षण अगदी जवळ आला होता. मात्र सध्या काँग्रेस पक्षाला बहुतेक शनीचा फेरा सुरू आहे. कारण हाती आलेल्या यशाला कसे लाथाडावे हे शिकायचे असेल तर त्यांनी काँग्रेस पक्षातील सध्याच्या सुंदोपसुंदीचा अभ्यास करावा. यापूर्वी हाती आलेली मध्य प्रदेशची सत्ता काँग्रेसने याच गोष्टीमुळे गमावली. त्यापूर्वी गोव्याचेही तेच झाले, कर्नाटकातही नाटकच झाले. एकूणच हातात घेतलेला घास तोंडात टाकण्यापेक्षा शेंबूड भरलेल्या नाकात टाकल्यामुळे घास तर नासून गेलाच पण शेंबूडही नासला. चंद्रपूर महानगर पालिकेत ६६ नगरसेवक निवडायचे होते. चंद्रपुरातील भाजपच्या भांडणामुळे काँग्रेसचे फावले त्यामुळे काँग्रेसचे २७ नगरसेवक निवडून आले. पाच नगरसेवक वंचितचे आणि तीन नगरसेवक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे आहेत. यांची बेरीज करून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांना हर्षवायू झाला होता. या आनंदाच्या प्रकटीकरणात वडेट्टीवार यांचा आत्मविश्वास जनतेला दिसून आला होताच. चंद्रपूरच्या राजकारणात जसे भाजपचे दोन परस्पर विरोधी गट आहेत तीच स्थिती काँग्रेसची आहे. एक गट खासदार बाईंचा दुसरा गट आमदार भाईंचा आहे. अशा परिस्थितीमुळे निकाल लागल्यावर दोन-चार दिवसात काँग्रेसच्या या दोन गटात लठ्ठालठ्ठी सुरू झाली. काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मध्यस्थी केली आणि एका गटाला महापौरपद तर दुसऱ्या गटाला स्थायी समिती हा आदेश त्यांच्याकडून देण्यात आला. आता मित्र पक्षाच्या सहाय्याने आपली सत्ता येणार असे मनाचे मनोरे बांधण्यात आले. तेवढ्यात तीन सदस्य असलेल्या उबाठाला अडीच वर्षे महापौर पदाचे डोहाळे लागले त्यानंतर हे प्रकरण चांगलेच चिघळले. काँग्रेसच्या दोन गटांचे भांडण किती विकोपाला जावे? काल नागपूरहून चंद्रपूरला जात असलेल्या एका गटाच्या नगरसेवकांना दुसऱ्या गटाकडून धमक्या मिळाल्या, अपहरणाचा प्रयत्न झाला. त्यामधील काही लोकांच्या तोंडावर दुपट्टा बांधल्याची चित्रफीत सर्वत्र प्रदर्शित झालेली आहे. प्रकरण पोलिसातही गेले म्हणजेच, हे दोन गट एका दगडावर दोन्ही बाजूने डोके आपटत आपटत आपले डोके वापरण्याजोगे नाहीच असे समजून ते फोडायला लागलेले दिसून येत आहेत. एकाच पक्षात राहून पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी आदेश देऊनही कोणाचेच काहीही ऐकायचे नाही असा निर्धार करून जो तमाशा चंद्रपूरच्या काँग्रेसजनांनी केला त्याला अजिबात तोड नाही. या दोन्ही गटाचे म्होरके एकेकाळी शिवसेनेचे पदाधिकारी होते म्हणजे या दोन्ही गटाचे प्रमुख मूळचे काँग्रेसजन नाहीत. काँग्रेसच्या हातात असलेली सत्ता या परस्पर विरोधातील उपद्व्यापामुळे आयतीच भारतीय जनता पक्षाच्या हाती जाऊ शकते. एवढे साधे गणितही या काँग्रेसजनांना कळत नाही. यावरून हे काँग्रेसजन नसून काँग्रेस गवतासारखे आहेत असे म्हणावेसे वाटते. कारण अमेरिकेतून आलेल्या मिलोदच्या बिया ज्या जमिनीला आणि उभ्या पिकांना दूषित करीत होत्या. त्यामुळे त्या मिलोदच्या बिया उगवल्यावर लोकांनी त्याचे नाव काँग्रेस गवत असे ठेवले होते. त्यावेळी काँग्रेसची सत्ता असल्यामुळे त्याला गाजर गवत असे नामकरण मिळाले. ते विषारी गाजर गवत पिकासाठी जसे घात करीत असायचे. तोच प्रकार चंद्रपूरच्या उपजाऊ भूमीमध्ये काँग्रेस जणांच्या बाबतीत सार्थ ठरेल, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. एकाच पक्षात राहून परस्परांना कसे हरवावे, याचा चंद्रपूरी तिढा हा असा आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी मनीषा पाटणकर - म्हैसकर यांची वर्णी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
राज्य सरकारने शुक्रवारी चार सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. त्यानुसार गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी मनीषा पाटणकर - म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी मिलिंद म्हैसकर यांची नेमणूक झाली आहे.

ज्येष्ठ सनदी अधिकारी आय. एस. चहल हे नियत वयोमानुसार उद्या, रविवारी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त होत असलेल्या गृह विभागाची जबाबदारी मनीषा पाटणकर -म्हैसकर यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. गृह विभागात नियुक्ती होण्यापूर्वी पाटणकर -म्हैसकर या सार्वजनिक बांधकाम विभागात अतिरिक्त मुख्य सचिव होत्या.

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक बुवेनेसवरी एस. यांची माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालकपदी बदली झाली आहे. तर एच. एस. वसेकर यांची नेमणूक संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण पुणे,या पदावर झाली आहे.

### महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्यास
# सुनेत्रा पवारांचा होकार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदावर कोण बसणार, अशी चर्चा सुरू झाली असून यात सुनेत्रा पवारांच्या नावावरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास होकार दिला असल्याचे समजते. तसेच शनिवारी सायंकाळी ५ वाजता शपथविधी देखील पार पडणार असल्याची माहिती समोर येत आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट) पक्षाची शनिवारी सकाळी ११ वाजता महत्त्वाची बैठक होणार असून या बैठकीत उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे बोलले जात आहे.

उद्याच्या बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर उद्याच शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना केले होते. त्यामुळे सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची शनिवारी महत्त्वाची बैठक



सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, तर त्या महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री ठरतील.

राजकीय चर्चा करण्यासाठी सुनेत्रा पवारांनी नरेश आरोरा यांना बारामती येथे बोलावले असल्याची माहिती आहे. नरेश आरोरा आणि सुनेत्रा पवार यांच्यात चर्चा झाल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आरोरा मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती आहे.

#### धार्मिक विधी झाल्यानंतर ठरवू - सुनील तटकरे



सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे.



लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याविषयी मला फारसे काही माहित नाही.

**छगन भुजबळ**

#### पक्षाध्यक्ष पदावरही होणार निर्णय

अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाची उद्या ११ वाजता महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीत पक्षाध्यक्ष पदावर कोण असणार यावर देखील निर्णय घेतला जाणार आहे. सुनेत्रा पवारच पक्षाच्या अध्यक्षा असाव्यात, अशी लोकांची भावना आहे. त्यानुसारच पक्ष निर्णय घेईल, असे बोलले जात आहे. दरम्यान, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांचे देखील पक्षाध्यक्ष पदासाठी नाव चर्चेत असल्याचे समजते. मात्र, या वृत्ताला राष्ट्रवादीच्या सूत्रांकडून दुजोरा देण्यात आलेला नाही.

### जनतेच्या भावना लक्षात ठेवूनच निर्णय



प्रफुल्ल पटेल यांचे सूचक विधान

जनभावना, आमदारांची भावना आणि प्रफुल्ल पटेल म्हणून माझी भावना ही सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसमधून त्या जागेवर बसवायची आहे. याचा निर्णय पक्षाने करायचा आहे. याबद्दल आम्ही सुनेत्रा वहिनी, पार्थ पवार, जय पवार यांच्याशी बोलू. जनतेच्या भावनेरूपच निर्णय होईल, असे म्हणत प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री होतील, असे संकेत आज माध्यमांशी बोलताना दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने भेट घेतल्यानंतर राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला आहे. या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी माध्यमांशी संवाद साधत महत्त्वपूर्ण वक्तव्य केले.

त्यांनी सांगितले की, जनभावनेचा आदर लक्षात घेऊन लवकरात लवकर निर्णय घेणे गरजेचे असल्याचे आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्पष्टपणे सांगितले आहे. अजित पवारांकडे जी जागा होती, त्या जागेबद्दल निर्णय करावा लागणार आहे. अजित पवार यांच्या खात्याबाबत तसेच राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित निर्णयांबाबत अनिश्चितता कायम राहू नये, अशी आमची भूमिका आहे. जनतेच्या भावना लक्षात घेता विलंब न करता ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर आम्ही आमची भूमिका मांडली आहे.

## महाराष्ट्राचा 'अर्थ' बदलणार?

### बजेट मांडण्याचे आव्हान कोण पेलणार?

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. ३० :**
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राज्याच्या अर्थकारणाचे चाणक्य मानले जाणारे अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे मंत्रालयात आणि राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. प्रशासकीय शिस्त आणि अर्थसंकल्पावरील अभ्यासू पकड यासाठी ओळखल्या जाणाऱ्या 'दादां'च्या अनुपस्थितीत आता राज्याचा 'अर्थगाडा' कोण ओढणार? हा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. अवघ्या तीन आठवड्यांवर आलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नवीन अर्थमंत्र्यांच्या नावाची उत्सुकता वाढली आहे.

मंत्रालयातील विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, अर्थमंत्रालयाची धुरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःच्या खांद्यावर घेण्याची दाट शक्यता आहे. फडणवीस यांनी यापूर्वी अर्थमंत्री म्हणून राज्याचा अर्थसंकल्प यशस्वीपणे मांडला असून, त्यांना या विषयाचा सखोल अनुभव आहे. अजितदादांच्या निधनानंतर निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिती आणि अर्थसंकल्पाची तांत्रिक तयारी पाहता, मुख्यमंत्रीच राज्याची तिजोरी आपल्याकडे ठेवतील असे संकेत मिळत आहेत.

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होत आहे. अर्थसंकल्पाचे काम सध्या अंतिम टप्प्यात असून, त्याला अंतिम मंजुरी देणारा आणि विधानसभेत तो ठामपणे मांडणारा खंबीर नेता राज्याला हवा आहे. अजित पवार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून अर्थखात्यावर आपली वेगळी मुद्रा उमटवली होती. आता त्यांच्या अनुपस्थितीत नवीन अर्थमंत्र्यांना प्रशासनाशी समन्वय साधून वेळेत बजेट सादर करण्याचे कठीण आव्हान पेलावे लागणार आहे.

महायुतीच्या सत्तावाटपानुसार अर्थखाते हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) कोट्यात होते. मात्र, दादांच्या निधनानंतर त्यांच्या गटातील इतर कोणा ज्येष्ठ नेत्याकडे हे महत्त्वाचे खाते सोपवले जाणार की प्रशासकीय सोयीसाठी मुख्यमंत्री ते स्वतःकडे ठेवणार, याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे. महायुतीच्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतरच यावर अधिकृत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

राज्याच्या इतिहासात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम अजित पवार यांच्या नावावर आहे. त्यांनी एकूण १० वेळा राज्याचे बजेट सादर करून एक मानदंड प्रस्थापित केला होता.

## एकीकरणासाठी दादा सकारात्मक होते

### जयंत पाटलांचा मोठा दावा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाबाबत पुन्हा एकदा मोठी चर्चा सुरू झाली असून, शरद पवार गटातील ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी यासंदर्भात महत्त्वाचे विधान केले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट एकत्र यावेत, हीच आपली सुरुवातीपासूनची भूमिका होती, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. अजित पवार यांच्या निधनानंतर प्रथमच एकीकरणाच्या मुद्द्यावर इतक्या ठाम शब्दांत प्रतिक्रिया देण्यात आल्याने, राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

जयंत पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतरही दोन्ही गट पुन्हा एकत्र यावेत, असा त्यांचा प्रयत्न सातत्याने सुरू होता. या भूमिकेतूनच त्यांनी आणि दुसऱ्या गटातील प्रमुख नेत्यांनी अनेक वेळा बैठका घेतल्या. या बैठका केवळ औपचारिक नव्हत्या, तर त्यामध्ये भविष्यातील राजकीय वाटचाल, निवडणुकांची रणनीती आणि पक्ष एकत्र आणण्याच्या शक्यतांवर सविस्तर चर्चा झाली होती, असेही त्यांनी नमूद केले.

जयंत पाटील यांच्या म्हणण्यानुसार, अजित पवार यांच्यासोबतही या विषयावर अनेकदा सविस्तर चर्चा झाली होती. विलयाच्या मुद्द्यावर अजित पवार सकारात्मक होते, असा ठाम दावा पाटील यांनी केला आहे.

दोन्ही गटांमधील गैरसमज दूर करून राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकसंध व्हावी, अशी भावना अजित पवारांची होती, असेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकींमध्ये कोणताही ताणतणाव न ठेवता खुलेपणाने चर्चा झाली होती, असे पाटील यांनी सूचित केले.

जयंत पाटील यांनी सांगितले की, अजित पवार यांची भूमिका अशी होती की आधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि अन्य स्थानिक निवडणुका आघाडी करून एकत्र लढवाव्यात. या निवडणुकांमधून जनतेचा कौल समजून घेतल्यानंतर राष्ट्रवादीच्या एकीकरणाबाबत अंतिम निर्णय घ्यावा, असे त्यांचे मत होते.

## राज्य सरकारची खर्चावर कात्री

### बजेटआधी निधी वितरणावर सरकारचे मोठे निर्बंध

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
महाराष्ट्र सरकारने प्रशासनावर वाढत चाललेल्या आर्थिक भाराला आळा घालण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आर्थिक शिस्त अधिक काटेकोरपणे पाळण्यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षातील बजेटमधील निधी वितरणावर मर्यादा आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासंदर्भात शासनाकडून परिपत्रक जारी करण्यात आले असून, विविध विभागांना खचार्बाबत विशेष दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

दरवर्षी अर्थसंकल्पात मंजूर केलेला संपूर्ण निधी प्रत्यक्ष खर्च होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने आधीच नियोजन करून खर्च कमी करण्याचा मार्ग स्वीकारल्याचे स्पष्ट झाले आहे.

शासनाच्या या निर्णयानुसार, बांधकामे, वाहन खरेदी, यंत्रसामग्री, जाहिरात आणि इतर प्रशासकीय खर्चावर निर्बंध आणण्यात आले आहेत. अनेक वेळा मंजूर केलेला निधी वेळेत खर्च न होता अखेर परत जातो, त्यामुळे अनावश्यक तरतुदी टाळण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. प्रशासनाने निधी मागणी करताना प्रत्यक्ष गरज आणि खर्चाची क्षमता लक्षात घ्यावी, असेही या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. आर्थिक शिस्त राखण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.



दरम्यान, जाहिरात, बांधकाम, वाहन खरेदी, यंत्रसामग्री आणि विविध प्रकारच्या अर्थसहाय्यासाठी निधी वितरणाचे प्रस्ताव सादर करण्यास संधी देण्यात आली आहे. मात्र, हे प्रस्ताव ठोस कारणांसह १२ फेब्रुवारीपर्यंत वित्त विभागाकडे सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. विनाकारण किंवा अपूर्ण तयारीचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नसल्याचा संकेत सरकारने दिला आहे. निधी वितरण करताना तो प्रत्यक्षात खर्च केला जाईल, याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांवर टाकण्यात आली आहे.

तथापि, अत्यावश्यक खर्चाच्या बाबतीत सरकारने कोणतीही कात्री लावलेली नाही. वेतन, निवृत्तीवेतन, व्याज भरणा, कर्ज परतफेड आणि आंतरलेखा हस्तांतरण यांसारख्या अनिवार्य खर्चांसाठी ९५ ते १०० टक्क्यांपर्यंत निधी वितरण ठेवण्यात आले आहे. यामुळे सरकारी कर्मचारी, निवृत्त कर्मचारी आणि कर्जविषयक देयकांवर कोणताही परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र विकासकामे आणि प्रशासकीय खर्चाच्या बाबतीत काटकसर पाळण्यावर सरकारचा भर आहे.

## अजितदादांचा अपघात की घातपात?

### न्यायालयीन चौकशीची वडेट्टीवारांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
समृद्धी महामार्गावर काँग्रेस नगरसेवकांवर झालेला प्राणघातक हल्ला आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा संशयास्पद विमान अपघात, या दोन मोठ्या घटनांनी राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे.



या पार्श्वभूमीवर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज नागपुरात बोलताना खळबळजनक प्रश्न उपस्थित केले आहेत. अजितदादांच्या मृत्यूची चौकशी सीआयडीऐवजी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांमार्फत करण्याची मागणी करत त्यांनी सरकारला धारेवर धरले आहे.

चंद्रपूरच्या काँग्रेस नगरसेवकांसोबत समृद्धी महामार्गावर घडलेला प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. काँग्रेस नगरसेवकांची बस अडवून त्यांना चाकू, तलवार आणि बंदुकीचा धाक दाखवण्यात आला. हा हल्ला करण्याचाच प्रयत्न होता, अशी माहिती वडेट्टीवार यांनी दिली.

**पोलिस तपासः** या हल्ल्यामागे नक्की कोण आहे आणि त्यांचा उद्देश काय होता, याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे.

अजितदादांच्या अपघातावर संशयाचे धुके बारामती येथे जाऊन अजित पवार यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतल्यानंतर वडेट्टीवार यांनी विमान अपघाताबाबत शंका व्यक्त केली.

लोकांच्या मनात या अपघाताबाबत अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे केवळ सीआयडी चौकशी करून चालणार नाही, तर निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या ऐक्यावर भाष्य करताना त्यांनी शरद पवारांच्या वयाचा आदर राखून सर्वांनी एकत्र यावे, अशी भावनाही व्यक्त केली.



**विरोधी पक्षनेते पदावरून सरकारची 'दुटप्पी' भूमिका**

येत्या अधिवेशनात विरोधी पक्षनेते पदाबाबत सरकार नवीन विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. यावर वडेट्टीवार यांनी सडकून टीका केली.

उपमुख्यमंत्री पद घटनात्मक नसतानाही ते चालते, मग विरोधी पक्षनेते पद देण्यास सरकारला भीती का वाटते? विरोध नको म्हणून पळवाटा शोधणारे हे सरकार दुटप्पी आहे, अशी टीका त्यांनी केली.

**शिक्षक आणि परीक्षांच्या गोंधळावरून सरकारचा छळ!**

जिल्हा परिषद निवडणुका आणि ळएळ परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी आल्याने शिक्षकांची मोठी कोंडी झाली आहे. राज्य सरकार आणि निवडणूक आयोगामध्ये समन्वय नसल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. एकाच वेळी दोन जबाबदाऱ्या लादून शिक्षकांना वेठीस धरणे हा त्यांचा छळ असल्याचे सांगत त्यांनी प्रशासकीय गोंधळाचा पाढा वाचला.



# अजित पवारांच्या नावावर राजकारण अमानुष



■ **मुंबई :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून राज्य अद्याप सावरलेले नसताना त्यांच्या नावावर सुरू असलेल्या राजकारणावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शुक्रवारी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या नावावर राजकारण करणे अतिशय अमानुष आहे आणि अशा विषयांवर आपण बोलणार नाही. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व राजकीय नेत्यांना संयम बाळगण्याचे आवाहन करत सध्याच्या दुःखद परिस्थितीत राजकीय चर्चा टाळण्याची गरज असल्याचे नमूद केले.

संजय राऊत म्हणाले की, अजित पवार यांच्या पार्थिवावर नुकतेच अंत्यसंस्कार करण्यात आले असून, महाराष्ट्र अजूनही त्यांच्या जाण्याच्या दुःखातून सावरलेला नाही. अशा परिस्थितीत कोणी त्यांच्या नावावर राजकीय डावपेच खेळत असेल, तर ते अत्यंत चुकीचे आहे. तळागाळातील कार्यकतेर्सुद्धा रडत होते. अशा वेळी किमान 15 ते 20 दिवस तरी राजकीय चर्चा नको. त्यांच्या पक्षातील अंतर्गत विषयांवर किंवा त्यांच्या कुटुंबातील निर्णयांवर बोलणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. माध्यमांनाही या विषयावर अनावश्यक चर्चा टाळण्याचे आवाहन त्यांनी केले.

पवार कुटुंबीयांच्या दुःखाचा उल्लेख करताना राऊत म्हणाले की, प्रत्येक कुटुंबीयाच्या डोळ्यात अश्रू होते आणि वातावरण अत्यंत भावनिक होते. एका महिलेनं आपला पती गमावला आहे, कुटुंबाने कर्ता पुरुष गमावला आहे. त्यांच्या डोळ्यात अजूनही अश्रू आहेत आणि त्यावर कोण नेतृत्व करणार, कोण पदावर येणार यावर चर्चा करणं माणुसकीशून्य आहे. मंत्री असो किंवा आमदार असो, अशा विषयावर बोलणं अमानुष आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. परिस्थिती स्थिरस्थावर झाल्याशिवाय राजकीय चर्चांना फाटा देऊ नये, असा सल्ला त्यांनी सर्व नेत्यांना दिला.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथील कर्तव्यपथावरील संचलनात महाराष्ट्राचा डंका

# गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' चित्ररथाला प्रथम पारितोषिक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथील 'कर्तव्यपथावर' पार पडलेल्या दिमाखदार संचलनात महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाने प्रथम क्रमांकाचा सर्वोच्च बहुमान पटकावला. आज दिल्लीत राष्ट्रीय रंगशाळा केंट येथे केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ व सहसचिव अमिताभ श्रीवास्तव यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

'गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या विषयावर आधारित या चित्ररथाने महाराष्ट्राची सांस्कृतिक समृद्धी आणि आर्थिक स्वावलंबनाचे दर्शन संपूर्ण जगाला घडवले. यंदाच्या चित्ररथातून महाराष्ट्राची अष्टविनायक परंपरा, गणेशोत्सवातील सार्वजनिक सहभाग आणि या उत्सवामुळे मिळणारा लाखो हातांना रोजगार (मूतीर्काम, सजावट, वाद्ये) यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले होते. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राचा गणेशोत्सव कसा पूरक ठरतो, हे या चित्ररथातून प्रकषार्ने मांडण्यात आले.



चित्ररथासोबत पारंपारिक वेशभूषेत लेझीम, नृत्य सादर करणाऱ्या कलाकारांनी कर्तव्यपथावर चैतन्य निर्माण केले. त्यांच्या ऊर्जेमुळेच महाराष्ट्राच्या चित्ररथाला विशेष पसंती मिळाली. शिवाय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक सादरीकरण करण्यासाठी पाठवलेल्या पथकाला देखील तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे .

"महाराष्ट्राच्या मातीतील कलेचा आणि कारागिरांच्या कष्टाचा हा सन्मान आहे. गणेशोत्सव हा केवळ उत्सव नसून तो अनेकांच्या रोजगाराचे आणि आत्मनिर्भरतेचे साधन आहे, हे आपण जगाला दाखवून दिले आहे. हे यश महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे आणि कलात्मक शिस्तीचे राष्ट्रीय पातळीवर झालेले ठळक दर्शन आहे, असे गौरोद्गार सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले. गौरवास्पद कामगिरीमागे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभिषण चवरे, यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व मोलाचे ठरले. चित्ररथ समूहातील अधिकारी, कलाकार आणि सर्व सहकाऱ्यांची मेहनत, समर्पण आणि संघभावना यामुळे हे यश शक्य झाले.

कर्तव्यपथावर महाराष्ट्राचा गौरवपूर्ण यशाने महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक उंचावली आहे. या चित्ररथाचे गीतलेखन बिभिषण चवरे यांचे असून गाण्याचे गीतकार मयुरेश सुकाळे व सिद्धेश जाधव आहे. संगीत संयोजन मनोहर गोलांबरे यांनी केले आहे.

कोल्हापूर, सातारा, सांगली ग्रामीण भागातून आलेल्या विविध कलाकारांनी तसेच चंद्रकांत पाटील व राजेंद्र संकपाळ यांच्या पथकाने सांघिक भावनेने ऐकतेचे प्रदर्शन करून उत्तमरित्या लेझीम नृत्याचे सादरीकरण केले. या चित्ररथाचे कलादिग्दर्शन व बांधणी नागपूर येथील तुषार प्रधान, रोशन इंगोले, कृष्णा सालटकर व श्रीपाद धोंगडे यांनी केले आहे.ज्ञानपरंपरेलाच अनुसरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आधुनिक कौशल्य प्रशिक्षणाची जोड देत आयटीआयच्या माध्यमातून नवा भारत घडवण्याचा प्रयत्न करत असल्याचेही लोढा यांनी स्पष्ट केले आहे.

# ठाकरे बंधूंबाबत आक्षेपार्ह पोस्ट धिंड काढत मनसैनिकांनी दिला चोप

■ **महासागर प्रतिनिधी, वसई, दि. ३० :**
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विरोधात एका तरुणाने अपशब्द उच्चार करीत समाजमाध्यमावर टीका केली आहे. या टिकेनंतर मनसे कार्यकर्त्यांनी या तरुणाला शोधून काढत चांगलाच चोप देत धिंड काढली. त्याचा व्हिडीओ ही मोठ्या प्रमाणात समाज माध्यमावर व्हायरल होत आहे.

समाज माध्यमावर प्रसिद्धी मिळविण्यासाठी आता कोणत्याही थराला जाऊन एखाद्यावर टीका करणे, याशिवाय त्याचा व्हिडीओ तयार करून समाज माध्यमावर टाकणे असे प्रकार वाढीस लागत आहेत. नुकताच नालासोपारा येथील एका तरुणाने मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अर्वाच्च भाषेत वक्तव्य करून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर टाकला होता. ही आक्षेपार्ह पोस्ट टाकणे या तरुणाच्या चांगलेच अंगलट आले आहे.

ही आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित झाल्यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. त्यांनी या तरुणाचा शोध घेत थेट राहत्या घरातून बाहेर काढून चांगलाच चोप देत त्यांची धिंड ही काढली आहे. याचा व्हिडीओ ही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तरुणाच्या या आक्षेपार्ह पोस्टमुळे विविध स्तरातून त्याच्या कृतीबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत मनसेच्या मनसे रिपोर्ट या अधिकृत ट्विटर हँडलवर देखील ट्विट करण्यात आले आहे. धिंड काढली. सन्माननीय राजसाहेब ठाकरे आणि सन्माननीय उद्धवजी ठाकरे यांच्याबद्दल केवळ व्ह्यूज मिळवण्यासाठी हा तरुण अर्वाच्च भाषेत टीका आणि शिवीगाळ करत होता. एका मर्यादेपर्यंत टीका सहन केली जाऊ शकते, परंतु प्रसिद्धीसाठी सातत्याने खालच्या पातळीवर जाऊन विधाने करणाऱ्या या तरुणाची महाराष्ट्र सैनिकांनी धिंड काढली. असे मनसेने या ट्विटमध्ये नमूद केले आहे.

# दादा तुम्हाला घट्ट मिठी मारायचीय : रोहित पवार

■ **वृत्तसंस्था, बारामती, दि. ३० :**
'अजितदादांच्या निधनाची दुर्दैवी बातमी आल्यापासून डोकं सुन्न आहे. मन बर्फाप्रमाणे थिजलंय. अजितदादांनी जिथं विकासरूपी फुलांची बाग फुलवली, तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं स्वप्नानतही वाटलं नव्हतं,' अशी भावनिक प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूनंतर पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाय.



अजित पवारांच्या निधनानंतर आज त्यांची राख सावडण्याचा विधी सकाळी बारामती येथील विद्याप्रतिष्ठानमध्ये झाला. यावेळी पार्थ पवार, जय पवार, श्रीनिवास पवार, रोहित पवार आणि पवार कुटुंबातील इतर सदस्यांची उपस्थिती होती. या विधीनंतर रोहित पवारांनी सोशल मीडियात एक पोस्ट करून आपल्या भावनांना वाट मोकळी करू दिली. अजित पवारांचा राख सावडण्याचा विधी झाला.

अजित पवारांचा राख सावडण्याचा विधी झाला. रोहित पवार आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हणतात, 'मा. अजितदादांनी जिथं विकासरूपी फुलांची बाग फुलवली तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं कधी स्वप्नातही आलं नाही.. पण नियतीच्या क्रूर खेळापुढं कुणाचं काही चालत नाही.. अजितदादांची ती दुर्दैवी बातमी आल्यापासून अद्यापपर्यंत डोकं सुन्न आहे.. मन बर्फाप्रमाणे थिजलंय.. काय झालं, कसं झालं आणि का झालं, या विचाराचं मनातलं काहूर थांबत नाहीय.

आपल्यात आत्तापर्यंत जे-जे काही संभाषण झालं, चर्चा झाल्या, विशेषतः शेवटच्या काही दिवसांमध्ये झालेल्या भावनिक चर्चा, हे सगळं काही एखादा टेपरेकॉर्डप्रमाणे सारखं सारखं कानात घुमतंय. जणू काही तुम्हीच अदृश्य स्वरूपात बोलत आहात असा भास होतोय.

# अजित पवारांची शरद पवारांसोबत जाण्याची मानसिकता होती



■ **सातारा :** राष्ट्रवादी काँग्रेसची खरी ओळख ही पवार कुटुंब आहे. अजित पवारांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जो काही त्याग करावा लागेल तो करण्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत. पवार कुटुंबाने एकत्र येऊन निर्णय घ्यावा, आम्ही सर्वजण त्यांच्या निर्णयाच्या पाठीशी उभे राहू, अशी स्पष्ट भूमिका शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मांडली आहे. पवार कुटुंबाला मानणारा मोठा जनाधार एकत्र आला असता तर 2029 मध्ये अजित पवारांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न नक्कीच पूर्ण होऊ शकले असते, मात्र ते स्वप्न अपूर्णच राहिले, असेही ते म्हणाले.

शशिकांत शिंदे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आणण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी प्रमुख नेत्यांच्या पाच ते सात बैठका झाल्या होत्या. या बैठकींमध्ये पक्षाच्या एकत्रीकरणाबाबत कोणते मुद्दे चचेर्ला घ्यायचे, यावर सविस्तर चर्चा झाली होती. मात्र त्याचदरम्यान निवडणूक जाहीर झाल्याने प्रक्रिया पुढे नेता आली नाही. शशिकांत शिंदे म्हणाले की, आठ ते दहा दिवसांपूर्वी अजित पवार आणि आम्ही जयंत पाटील यांच्या बंगल्यावर एकत्र बसलो होतो. एकत्रीकरणात कुठेही अडथळा येऊ नये, मतांचे विभाजन होऊ नये, यासाठीच घड्याळ या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर 9 ते 10 तारखेपर्यंत अंतिम निर्णय म्हणजेच सोक्षमोक्ष लावायचा, असेही ठरले होते. मात्र दुर्दैवाने तो निर्णय होऊ शकला नाही आणि एकत्रीकरणाचे स्वप्न स्वप्नच राहिले.

# १०० युनिट वीज वापरणाऱ्यांना स्मार्ट सोलार

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ३० :**
शासनाने तीन महिन्यांपूर्वी स्वयंपूर्ण महाराष्ट्र निवासी रूफटॉप (स्मार्ट) सोलार योजना सुरू केली. यातून दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या अल्प उत्पन्न व बीपीएल कुटुंबांना ९०% ते ९५% अनुदानासह छतावरील सौरऊर्जा संच बसवला जाईल. त्यामुळे २५ वर्षे मोफत किंवा शून्य वीज बिलाचा लाभ मिळेल.

स्मार्ट योजनेतून ९० टक्क्यांपर्यंत अनुदान : राज्य शासनाने ऑक्टोबर २०२५ पासून ही योजना अमलात आणली आहे. दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या अल्प उत्पन्न गटातील तसेच बीपीएल कुटुंबांना या योजनेचा प्राधान्याने लाभ दिला जात आहे. १ किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प बसवण्यासाठी सुमारे ७० हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. यामधून केंद्र व राज्य शासनाकडून ४७ हजार ५०० रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. लाभार्थींना केवळ २ हजार ५०० ते १० हजार रुपये इतकाच स्वहिस्सा भरावा लागणार आहे.

सौर प्रकल्पाचे आयुष्य लक्षात घेता लाभार्थींना पुढील २५ वर्षांपर्यंत वीज बिलाचा खर्च टळणार. घरगुती पातळीवर सौरऊर्जा निर्मिती वाढल्यास महावितरणवरील भारही कमी होण्यास मदत होईल. राज्यभरात ५ लाख वीज ग्राहकांना सोलार बसवण्याचे उद्दिष्ट आहे. महागाईच्या काळात वाढत्या वीजदरांचा फटका सामान्य नागरिकांना बसत असताना, स्मार्ट सोलार योजना घरगुती अर्थसंकल्पाला मोठा दिलासा देणारी ठरणार. सामान्यांच्या छतावरून वीजनिर्मितीचे उद्दिष्ट असलेली ही योजना सौरऊर्जा धोरणात महत्त्वाचा टप्पा आहे.



महावितरणला ८ रुपये युनिट एवढा खर्च येतो. सुमारे ६० ते ६५ टक्के १०० युनिट खालील वीज ग्राहक आहेत. त्यांनी सोलार बसवल्यास महावितरणची बचत होईल. महावितरणने टेंडर काढून व्हेंडरची निवड केली जाईल. ग्राहकांना केवळ अर्ज करायचा आहे. वीज वापरणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन स्मार्ट सोलार योजना राबवली जाते.

# माजीमंत्री धनंजय मुंडे यांच्या बनावट फेसबुक खात्यावरून आक्षेपार्ह पोस्ट

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ३० :**
राज्याचे माजीमंत्री अन्न व नागरीपुरवठामंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांचे फेसबुक अकाउंट बनावट पद्धतीने उघडून त्यावर काही आक्षेपार्य पोस्ट डकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी धनंजय मुंडे यांच्या खाजगी जनसंपर्क अधिकाऱ्याकडून तक्रार दाखल करण्यात आली आहे.



बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत गावत यांनी या प्रकरणी कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे जनसंपर्क अधिकारी सुदर्शन सांगळे यांच्या माध्यमातून बीड सायबर पोलीस ठाण्यामध्ये बनावट फेसबुक खाते उघडून त्यावर काही आक्षेपार्य मजकूर लिहिल्या संदर्भात फिर्याद दिली आहे.

फेसबुकवर बनावट खात्याच्या माध्यमातून पाठवलेले आक्षेपार्ह संदेश हे जाणीवपूर्वक बदनामीचा प्रयत्न असून, त्याबाबतची जबाबदारी फक्त बनावट खाते संचालन करणाऱ्यांची असेल, असे फियार्दीत नमूद केले असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणाचा तपास करून संबंधितांना लवकर अटक करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिल्याचे सांगण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त कळताच धनंजय मुंडे हे बुधवारीच बारामतीकडे रवाना झाले.

गुरुवारीही मुंडे हे बारामतीमध्येच असून, याच दिवशी मुंडे यांच्या निकटवतीर्यांना नेत्याच्या फेसबुक अकाऊंटवरील संदेश पाहून संशय आला. ज्या काही आक्षेपार्ह पोस्ट तयार करण्यात आलेल्या होत्या, त्यावरून फेसबुक अकाऊंट बनावट पद्धतीने तयार केल्याचा संशय बळावल्याची खात्री पटताच मुंडे यांचे जनसंपर्क अधिकारी सुदर्शन सांगळे यांनी तातडीने तक्रार दाखल केली आहे.

# अजित पवारांच्या निधनानंतर शरद पवार सक्रिय

## दूषित झालेल्या नीरा नदीची केली पाहणी



■ **वृत्तसंस्था, बारामती, दि. ३० :**
राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती व येथे राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाची भावना ही पोरकेपणाची झाली होती. परंतु, आज अजित पवारांच्या अस्थि विसर्जनानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार हे स्वतः बारामतीमध्ये सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज बारामती येथे शरद पवारांकडून नीरा नदीची पाहणी करण्यात आली.

अजित पवारांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. विशेषतः बारामतीमध्ये सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अजित पवारांनी बारामतीचा कायापालट केला आहे, आता अजितदादानंतर बारामतीकडे कोण बघणार, इथल्या लोकांच्या समस्या कोण बघणार, असा प्रश्न बारामतीकरांना पडला होता. परंतु, अजित पवारांच्यानंतर आता शरद पवार बारामतीमध्ये सक्रिय झाले आहेत. त्यांनी येथील नीरा नदीची पाहणी केली आहे.

नीरा नदीबद्दल सातत्याने चर्चा होती की नीरा नदी प्रदूषित झाली आहे. आता त्याची पाहणी करून यासंदर्भात शरद पवारांनी माहिती घेतली आहे. अजितदादांच्या निधनाने शरद पवार खचल्याचे पाहायला मिळाले होते. मात्र, आज शरद पवारांनी पुन्हा कामाला सुरुवात करत बारामतीकरांना विश्वास धीर देण्यासाठी सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे.

शरद पवार जेव्हा नीरा नदीची पाहणी करण्यासाठी पोहोचले तेव्हा येथील स्थानिकांनी कार्यकर्त्यांनी येथील तक्रारी व समस्या मांडल्या. नदीचे पाणी क्षारयुक्त झाले असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या दूषित पाण्यामुळे शेतीवर परिणाम होत असून जमिनी सुद्धा क्षारपट झाल्याचे येथील स्थानिकांनी सांगितले आहे. तसेच नीरा नदीत कारखान्याचे दूषित पाणी सोडल्याने नदीचे पाणी खराब झाले आहे.

# उल्हासनगर महापालिकेचे महापौर व उपमहापौर बिनविरोध

■ **महासागर प्रतिनिधी उल्हासनगर, दि. ३० :**
उल्हासनगर महापालिकेच्या महापौर पदावर शिवसेनेच्या आश्विनी कमलेश निकम व उपमहापौर पदावर भाजपाचे अमर लुंड यांची बिनविरोध निवड झाली असुन यांच्या नियुक्तीची घोषणा ३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महासभेत होणार आहे.

सेना भाजपा युती झाल्याने ही निवड बिनविरोध झाली आहे. मात्र उल्हासनगर महापालिकेत आता विरोधी पक्षच नसल्याची चर्चा सुरु झाली आहे.

उल्हासनगर महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाची निवडणुक ३ फेबृवारी रोजी होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली होती. तेव्हा आज नामांकन पत्र दाखल करण्याचा दिवस होता, तेव्हा शिवसेना भाजपाची युती झाल्याने आज शिवसेनेच्या आश्विनी कमलेश निकम यांनी महापौर पदासाठी आपले नामांकन पत्र सादर केले आहे. तर उपमहापौर पदासाठी भाजपाचे अमर लुंड यांनी नामांकन पत्र दाखल केले आहे. शिवसेना भाजपा कडुन दोन्ही पदाचे नामांकन पत्र आल्याने ही निवडणुक बिन विरोध झाली आहे. उल्हासनगर महापालिकेची निवडणुक शिवसेना व भाजपा यांनी युती न करता स्वंतत्र पणे लढवली असुन एकमेकावर आरोप प्रत्यारोप करत या निवडणुकीत भाजपाने ३७ जागावर विजय मिळवला आहे. तर शिवसेनेने ३६ जागा जिंकुन भाजपाला टक्कर दिली आहे.

# खराडीत वाहनाच्या चाकाखाली येऊन चिमुरड्याचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३० :**
खराडी परिसरात पिकअप वाहनाच्या चाकाखाली आल्याने दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अधिक तपास करत आहेत. मयूर अमर माळवे (वय 2) असे मृत बालकाचे नाव आहे. राजू मगन ढोले (वय 66, रा. बाळकृष्ण अपार्टमेंट, ढोले-पाटील रस्ता) या पिकअप वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आयटीआय होणार सर्वोत्तम 'स्किल डेव्हलमपेंट हब'

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शाश्वत विकासाच्या दूरदृष्टीच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या ' पीएम सेतू ' या योजनेमुळे महाराष्ट्रातील आयटीआय सर्वोत्तम 'स्किल डेव्हलमपेंट हब' होणार असल्याचे, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील चार जिल्ह्यात ही योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण होणार असून पुढच्या टप्प्यात उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे.



कुशल मनुष्बळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम सेतू योजनेतून आयटीआयचे आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. या योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण केले जाणार आहे.

आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी हब अँड स्पोक प्रारूप विकसित केले जाणार आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार असून यामुळे राज्यातील आयटीआयचे रूप पालटणार आहे. या आधुनिकीकरणामुळे तरुणांना विविध क्षेत्रात दजेर्दार व्यावसायिक संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी करण्यासही मान्यता देण्यात आली. योजनेकरिता केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी वरील प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात एका क्लस्टरकरिता (१ हब आयटीआय व ४ स्पोक आयटीआय) पाच वर्षाकरीता अंदाजित २४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता केंद्र सरकारचे ११२ कोटी रुपये, राज्य शासनाचे ९८ कोटी रुपये आणि उद्योग क्षेत्राचा ३१ कोटी रुपयांचा वाटा असेल. त्यापैकी राज्य शासनाकडून पाच वर्षाकरिता करावयाच्या ९८ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

एका हब आयटीआयमध्ये सरासरी चार नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार असून, दहा विद्यमान अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे.

### पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे यांचा समावेश

नागपूर येथील गव्हर्न्मेंट आयटीआय, नागपूर आयटीआयचे हब म्हणून आधुनिकीकरण केले जाईल. मुलींसाठीचे आयटीआय, नागपूर, कामटी, हिंगणा आणि बुटीबोरी येथील आयटीआयचा समावेश आहे. छत्रपती संभाजी नगर येथील आयटीआय हब म्हणून आधुनिकीकरण करणार. त्याचबरोबर पैठण, खुल्ताबाद, गंगापूर आणि फुलंब्री येथील आयटीआयचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. पुण्यातील औंध येथील आयटीआयचा हब म्हणून आधुनिकीकरण केले जाणार. औंध येथील मुलींसाठीचे आयटीआय, खेड-राजगुरूनगर आणि मुळशी येथील आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

# पूर्ववैमनस्यातून तरुणावर खुनी हल्ला

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३० :**
पुण्यातील कात्रज परिसरातील संतोषनगर येथे पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने हल्ला करून खुनाचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रकरणी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, जखमी तरुणावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अजमल अब्दुल नदाफ (वय 20, रा. आशियाना बिल्डींग, अंजनीनगर, कात्रज) असे जखमी तरुणाचे नाव आहे. आर्यन काळे, यश बोरकर, शुभम पोगुल यांच्यासह त्यांच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजमलचे वडील अब्दुल रहीम नदाफ (वय 45) यांनी आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजमल नदाफ याची आरोपींशी यापूर्वी भांडणे झाली होती. अजमल कात्रजमधील संतोषनगर भागातून जात असताना आरोपींनी त्याला अडवले. त्यांनी शिवीगाळ करत तीक्ष्ण शस्त्राने त्याच्यावर वार केले. या हल्ल्यात अजमल गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर पसार झालेल्या आरोपींचा शोध सुरू असून, सहायक पोलिस निरीक्षक मुलाणी या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# महापौरपदावर अनुभवी नेतृत्वाची शक्यता!

## महिला नगरसेवकांची संख्या अधिक; झुकते माप मिळण्याची चर्चा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.30)** – अमरावती महापालिकेत भारतीय जनता पक्षाने मनपा गटनेत्याची निवड करून एक महत्त्वाचा टप्पा पार केला असला, तरी आता सर्वांचे लक्ष महापौरपदाच्या उमेदवाराकडे लागले आहे. भाजपसह संपूर्ण शहरात नव्या महापौराच्या नावाबाबत उत्सुकता वाढली असून, या पदावर अनुभवी व्यक्तीचीच वर्णी लागण्याची शक्यता जवळपास निश्चित मानली जात आहे. दरम्यान, विदर्भातील इतर तीन महापालिका प्रमाणे अमरावतीतही महिलांना झुकते माप मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या पाच वर्षांपासून महापालिकेवर प्रशासक राज असल्याने विकासकामांमध्ये मोठा अनुशेष निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत सभागृहाचा अनुभव असलेला महापौर मिळाल्यास शहराच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. सर्वाधिक सदस्यसंख्या असलेल्या भाजपकडे एकूण 25 नगरसेवक असून, त्यापैकी 17 महिला व 8 पुरुष नगरसेवक आहेत. पुरुष नगरसेवकांमध्ये माजी महापौर चेतन गावंडे यांची विद्यमान गटनेतेपदी नियुक्ती झाल्याने त्यांची पुन्हा महापौरपदी निवड होण्याची शक्यता कमी आहे. तसेच माजी महापौर संजय नरवणे यांनाही पुन्हा संधी मिळणे अवघड मानले जात आहे. उर्वरित पुरुष नगरसेवकांपैकी मिलिंद बांबल व बंडू हिवसे हे अन्य पक्षातून भाजपमध्ये आले असल्याने त्यांची दावेदारीही कमकुवत मानली जात आहे. मात्र, दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आशिष अतकरे हे सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून ओळखले जात असल्याने महापौरपदासाठी ते योग्य उमेदवार असल्याची चर्चा आहे. इतर पुरुष नगरसेवक नवखे असल्याने त्यांची निवड पक्षासाठी नुकसानदायक ठरू शकते, हे भाजप नेतृत्वालाही ज्ञात असल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे भाजपच्या महिला नगरसेवकांमध्ये लविना हर्षे, नूतन भुजाडे, राधा कुरिल व पद्मजा कौडण्य या अनुभवी असल्याने त्यांचीही महापौरपदासाठी वर्णी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापौरपदासाठी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

यंदा हे पद 'ओपन' प्रवर्गासाठी असल्याने अनेक नवनिर्वाचित नगरसेवकांची नावे चर्चेत आहेत. मात्र, सत्तेत सहभागी वायएसपीसह अन्य मित्रपक्षांना विश्वासात घेऊनच निर्णय घ्यावा लागणार असल्याने भाजपसमोर आव्हान उभे आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ओपन प्रवर्गामुळे प्रामुख्याने पुरुष दावेदारांवर विचार सुरू आहे. अपेक्षित राजकीय घडामोडी घडल्यास यंदाही महापौरपद भाजपकडेच राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महिला नगरसेवकांची संख्या अधिक असली, तरी त्यांना विषय समित्या व स्थायी समित्यांमध्ये समायोजन दिले जाण्याची शक्यता आहे.

### 6 फेब्रुवारीला 'पदग्रहण'

अमरावती महापालिकेच्या नव्या सभागृहाची पहिली बैठक येत्या 6 फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. मुंबईत झालेल्या बैठकीनंतर भाजप व वायएसपी यांच्यात युती निश्चित झाल्याची चर्चा असून, त्यानुसार महापौर व उपमहापौरपदाची निवड होणार आहे. उपमहापौरपद शिवसेना (शिंदे गट) यांना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महापौर व उपमहापौरपदासाठी अनेक नगरसेवकांनी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. भाजप, शिंदे शिवसेना, काँग्रेस व एमआयएम पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज सादर केल्याने राजकीय वातावरण तापले आहे. महापौरपदासाठी काँग्रेसचे डॉ. संजय शिरभाते, एमआयएमचे सय्यद रशीद अली शौकत अली व नजीब खान करीम खान यांनी अर्ज दाखल केले आहेत. उपमहापौरपदासाठीही चार अर्ज दाखल झाले आहेत. नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया सोमवार, 2 फेब्रुवारी रोजी सकाळी 11.30 ते सायंकाळी 6.15 या वेळेत होणार असून, आगामी निवडणुकीत जोरदार राजकीय चुरस पाहायला मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# शुक्रवार बाजारात मोठी धडक कारवाई

### अतिक्रमणमुक्त परिसराने घेतला मोकळा श्वास

### 300-400 भाजी विक्रेत्यांना नियोजित जागा








**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.30)**– अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवार, दि. 30 जानेवारी 2026 रोजी शुक्रवार बाजार परिसरात दहा वर्षांतील ऐतिहासिक संयुक्त कारवाई राबविण्यात आली. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या स्पष्ट आदेशानुसार 24 तासांच्या आत नियोजनबद्ध धडक मोहीम हाती घेण्यात आली. या कारवाईमुळे दीर्घकाळ अतिक्रमणाने ग्रस्त असलेल्या परिसराने अक्षरशः मोकळा श्वास घेतला.

कारवाईपूर्वी अधिकृत व अनधिकृत गाळेधारक तसेच दुकान मालकांची तपासणी करण्यात आली. मास विक्रीसाठी कोणालाही अधिकृत परवाना नसल्याचे निदर्शनास आले. महानगरपालिकेच्या संकुलात 39 दुकाने मंजूर असतानाही मोठ्या प्रमाणावर वाहने उभी करून अतिक्रमण करण्यात येत होते. याबाबत 29 जानेवारी रोजी संबंधितांना तसेच पशुवैद्यकीय विभागामार्फत मास विक्रेत्यांना नोटिसा बजावण्यात आल्या. त्यानुसार 30 जानेवारी रोजी पशुवैद्यकीय, अतिक्रमण व बाजार परवाना विभाग तसेच फेजरपुरा पोलीस स्टेशनच्या संरक्षणात व्यापक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सुमारे 50 वाहने हटविण्यात आली व 20 दुकानांचे अतिक्रमण काढण्यात आले. सागर नगरकडे जाणारा रस्ता पूर्णतः मोकळा करण्यात आला. या कारवाईचा मोठा लाभ म्हणजे शुक्रवार बाजारातील सुमारे 300 ते 400 भाजी विक्रेत्यांना नियोजित व योग्य जागा उपलब्ध झाली. त्यामुळे वाहतूक व स्वच्छता व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. डॉ. सचिन बोंद्रे, सहायक आयुक्त अविनाश रक्ताटे व उदय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वी ठरली. शहरातील स्वच्छता व सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

### वाहतुकीला दिलासा

शहरातील शुक्रवार बाजार परिसरात आज महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली. कारवाईनंतर बाजार परिसरात पूर्वीप्रमाणे अनियोजित पद्धतीने बाजार न भरता सुयोग्य नियोजनानुसार बाजार भरविण्यात आला, त्यामुळे परिसरात शिस्तबद्ध व्यवस्था पाहायला मिळाली. वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या स्टॉल्स, वाहने व इतर अडथळे तात्काळ हटविण्यात आले, परिणामी रस्ते मोकळे होऊन वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला. तसेच भाजी व इतर विक्रेत्यांना नियोजित जागा देऊन 'वेल प्लॅन' पद्धतीने बाजाराची मांडणी करण्यात आली. या नियोजनामुळे बाजार परिसरात गर्दी कमी होऊन वाहतूक सुरळीत झाली असून नागरिकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे. महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने पुढील काळातही अशा प्रकारचे नियोजन कायम ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# अमरावती मनपा भाजप गटनेतेपदी चेतन गावंडे




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.30)**– अमरावती महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने माजी महापौर चेतन गावंडे यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. अमरावती महानगरपालिका भाजप गटनेतेपदी त्यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मनपा निवडणुकीत भाजपचे एकूण 25 नगरसेवक निवडून आले असून, गटनेतेपदासाठी माजी महापौर तथा साईनगर-अकोली प्रभागाचे नगरसेवक चेतन गावंडे यांच्या नावाचा प्रस्ताव संजय नरवणे यांनी मांडला. या प्रस्तावास राधा कुरिल यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्व नगरसेवकांनी एकमताने चेतन गावंडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. या निवडीवेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, प्रविण पोटे, शिवराय कुलकर्णी, दिनेश सूर्यवंशी तसेच शहर व जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. नव्या भूमिकेतून महापालिकेत सक्षम व आक्रमक विरोधकाची भूमिका बजावण्याचा निर्धार चेतन गावंडे यांनी व्यक्त केला.

# अ.भा.आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचा अमरावतीत ऐतिहासिक महाकुंभ




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.30)** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धा (पुरुष व महिला) 1 ते 10 फेब्रुवारी 2025 या कालावधीत अमरावतीत आयोजित करण्यात आली आहे. देशभरातील विद्यापीठ संघांच्या सहभागामुळे ही स्पर्धा अमरावतीसाठी ऐतिहासिक ठरणार असून शहराला राष्ट्रीय क्रीडा नकाशावर अधोरेखित करणारी ठरणार आहे. या स्पर्धेत पुरुष गटात 107 तर महिला गटात 98 असे एकूण 205 संघ सहभागी होणार असून सुमारे 3,500 हून अधिक खेळाडू अमरावतीत दाखल होणार आहेत. त्यामुळे शहरात क्रीडामय व उत्साही वातावरण निर्माण होणार आहे. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषवतील. उद्घाटन वक्ते म्हणून हर्षवर्धन देशमुख, तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यवाहक कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित राहतील. स्पर्धेचे कार्यकारी अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले असतील. स्पर्धेची सुरुवात 1 फेब्रुवारी रोजी दुपारी 2 वाजता चॅम्पियनशिप बॅटन मिरवणुकीने होणार असून पुरुष गटाचे उद्घाटन सामने त्याच दिवशी दुपारी 4 वाजता होतील. महिला गटाचा उद्घाटन सोहळा 6 फेब्रुवारी रोजी होणार आहे. ही स्पर्धा शहरातील पाच प्रमुख मैदानांवर पार पडणार आहे.

# काँग्रेस गटनेतेपदी विलास इंगोले





महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतर अमरावती महापालिकेतील काँग्रेसच्या 15 सदस्यीय गटाच्या गटनेतेपदी माजी महापौर विलास इंगोले यांची सर्वसम्मतीने निवड करण्यात आली. काँग्रेस भवन येथे पार पडलेल्या काँग्रेस नगरसेवकांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत डॉ. अर्चना आत्राम व प्रशांत महल्ले यांनी विलास इंगोले यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावास शहर काँग्रेस अध्यक्ष व नगरसेवक बबलू शेखावत यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर टाळ्यांच्या गजरात विलास इंगोले यांच्या गटनेतेपदी निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली. गटनेतेपदी निवड होताच उपस्थित सर्व काँग्रेस नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले. अनेक नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांनी विलास इंगोले यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा पक्षाला निश्चितच लाभ होईल, अशी भावना व्यक्त केली. महापालिका सभागृहातील तब्बल 30 वर्षांचा अनुभव, प्रशासनाची सखोल जाण आणि आक्रमक भूमिका ही त्यांची ओळख आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे विलास इंगोले हे जवाहर गेट-बुधवारा प्रभाग क्रमांक 14 मधून सलग सातव्यांदा निवडून आले असून, त्यांनी संपूर्ण काँग्रेस पॅनल विजयी करून आणले आहे. आजवर झालेल्या सर्व सात निवडणुकांत ते अजेय ठरले आहेत.

# वरूडमध्ये रेती चोरीवर घणाघात; माफियांची साखळी उघड

### 5 आरोपी अटकेत, 42.70 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.30)** – जिल्ह्यात खुलेआम सुरू असलेल्या अवैध रेती चोरीच्या धंद्यावर वरूड पोलिसांनी निर्णायक कारवाई करत मोठा दणका दिला आहे. वरूड तालुक्यातील गणेशपूर परिसरात विनापरवाना व विना रॉयल्टी सुरू असलेल्या रेती वाहतुकीचा पर्दाफाश करत पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली असून हायवा डंपरसह एकूण 42 लाख 70 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये ईर्शाद ईशाक शेख (30), मुकीद माजीद सिद्दीकी (30), अश्पाक मुस्तफा अन्सारी (48), एहेफाज आहत सिद्दीकी (25) सर्व रा. मोहाड, ता. नरखेड, जि. नागपूर तसेच डंपर चालक दुर्गेश श्यामसुंदर सूर्यवंशी (25) यांचा समावेश आहे. मोर्शी उपविभागाचे पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार यांच्या पथकाने शुक्रवारी पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही धडक कारवाई केली. गणेशपूर गावाजवळ टाटा कंपनीचा सिग्ना हायवा डंपर अवैधरित्या ओव्हरलोड रेती वाहतूक करताना आढळून आला. विशेष म्हणजे, डंपरच्या पुढे स्विफ्ट डिझायर कारद्वारे 'पायलटींग' करून पोलिसांची नजर चुकवण्याचा प्रयत्न होत असल्याचे उघड झाले.

# क्रेडाई ग्रँड प्रॉपर्टी एक्स्पो-2026 चे आज लोकार्पण

### मनपा आयुक्त सौम्या शर्मा व एसडीओ अनिल भटकर यांच्या हस्ते उद्घाटन

### 35 हून अधिक बिल्डर्सचा सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.30)** – अमरावतीकरांच्या घराच्या स्वप्नाला दिशा देणाऱ्या क्रेडाई परिवाराच्या वतीने 'क्रेडाई ग्रँड प्रॉपर्टी एक्स्पो-2026' चे आयोजन 30 जानेवारी ते 2 फेब्रुवारी दरम्यान सायन्सकोर मैदानावर करण्यात आले आहे. या भव्य एक्स्पोचे औपचारिक लोकार्पण शनिवार, दि. 31 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता मनपा आयुक्त सौम्या शर्मा व उपविभागीय अधिकारी (एसडीओ) अनिल भटकर यांच्या हस्ते होणार आहे.

गेल्या 15 वर्षांपासून सातत्याने आयोजित होणाऱ्या या उपक्रमात यंदा अमरावतीसह विविध शहरांतील निवासी व व्यावसायिक प्रकल्पांची माहिती एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे. 35 हून अधिक नामांकित बिल्डर्सचे स्टॉल, तसेच 18 पेक्षा अधिक बँका, बिल्डिंग मटेरियल कंपन्या व प्रायोजक सहभागी झाले आहेत. किफायतशीर दरात घर खरेदीसाठी नागरिकांना ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना क्रेडाईचे अध्यक्ष राजन पाटील यांनी सांगितले की, ग्राहकांना विश्वासार्ह व दर्जेदार घरे मिळावीत, या उद्देशाने हा एक्स्पो आयोजित केला जातो. शहरात हवाई सेवा, पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क यांसारख्या प्रकल्पांमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळत असून, आगामी काळात बांधकाम क्षेत्रात मोठी वाढ अपेक्षित आहे. सध्या दीड एकर क्षेत्रात होणारा हा एक्स्पो भविष्यात तीन एकरांपर्यंत वाढवण्याचा मानस असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच 10 ते 12 बिल्डर्स वेटिंगवर असल्याची माहितीही देण्यात आली. क्रेडाईशी संलग्न कोणत्याही बिल्डरविरोधात आजवर फसवणुकीची तक्रार आलेली नसल्याचे सांगून, तक्रार आल्यास पाच सदस्यीय समितीद्वारे चौकशी केली जाते, असेही स्पष्ट करण्यात आले. क्रेडाई सीएसआर फंडातून विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी दोन मिनिटांचे मौन पाळून राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. उद्घाटनप्रसंगी एचडीएफसी बँक व महाराष्ट्र बँकेच्या प्रतिनिधींच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

### 1 फेब्रुवारीला अभिनेत्री गिरीजा ओक यांची उपस्थिती



मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री गिरीजा ओक या रविवारी, 1 फेब्रुवारी रोजी एक्स्पोला भेट देणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे उपक्रमाला विशेष आकर्षण मिळणार आहे.

### 'क्रेडाई आहे, तर विश्वास आहे...'

क्रेडाईचे सचिव श्रीकांत धर्माळे यांनी सांगितले की, संस्थेचे 150 हून अधिक सदस्य असून, मागील वर्षी 10 ते 12 हजार नागरिकांनी एक्स्पोला भेट दिली होती. यंदा दररोज 5 हजारांहून अधिक नागरिकांची उपस्थिती अपेक्षित आहे.

### सामाजिक उपक्रमांना प्राधान्य

संयोजक कपिल आंडे यांनी सांगितले की, अवयवदान जनजागृती, पर्यावरण संवर्धन, लकी ड्रॉ व विजेत्याला सोन्याचे नाणे, तसेच स्टॅम्प ड्युटीमध्ये सवलती यांसारखे उपक्रम राबवले जाणार आहेत.

# रस्ते झाले जीवघेणे; एकाच दिवशी तीन अपघात, तिघांचा मृत्यू

### वरुड, दर्यापूर व लोणी टाकळी हद्दीत वेगवेगळ्या घटनांनी जिल्हा हादरला



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 30)** – जिल्ह्यातील रस्त्यांवर अपघातांचा कहर पुन्हा एकदा उफाळून आला. एकाच दिवसात घडलेल्या तीन वेगवेगळ्या अपघातांत तिघा निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याने जिल्हा हादरला असून तीन कुटुंबांवर शोककळा पसरली आहे. वरुड, दर्यापूर आणि लोणी टाकळी या तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत या दुर्घटना घडल्या.

**हॉटेलजवळील धडकेत युवकाचा मृत्यू**

वरुड तालुक्यातील वृंदावन हॉटेलजवळ सायंकाळच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात स्कूटीवरून प्रवास करणारे अब्दुल नावेद अब्दुल वहीद (वय 28, रा. शहापूर) गंभीर जखमी झाले. उपस्थित नागरिकांनी तातडीने मदतीचा प्रयत्न केला; मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. मृतकाचे मोठे भाऊ अब्दुल जुनेद यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी संबंधित दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

### पहाटेचा प्रवास ठरला अखेरचा

दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमरावती मार्गावरील लाखपूर फाट्याजवळ पहाटे अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक फरार झाला असून मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. दर्यापूर पोलिसांकडून अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे.

### उपचारादरम्यान मृत्यू

अमरावतीहून मूर्तिजापूरकडे जात असताना नागझिरी येथील सावजी ढाब्याजवळ अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात रवि मधुकर फाले गंभीर जखमी झाले. नागरिकांनी माणुसकी दाखवत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. या प्रकरणी श्रीराम दिगांबर भाकरे यांच्या तक्रारीवरून लोणी टाकळी पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# राष्ट्रवादीचे पुढे काय?

२८ जानेवारी रोजी सकाळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. २०२३ मध्ये काका शरद पवार यांच्यापासून वेगळे झाल्यानंतर अजित दादा राष्ट्रवादी काँग्रेसची सूत्रे आपल्या हाती घेतली होती. येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका अजित पवार आणि शरद पवार यांच्या दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार होते. असे मानले जात होते की संपूर्ण नियंत्रण अजित पवार यांच्या हातात राहणार होते.आता त्यांच्या निधनानंतर या आघाडीचे काय होईल, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा नवीन प्रमुख कोण असेल, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री पद अजित पवार यांच्या कुटुंबातील कोणाला मिळेल का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

-------------------

अजित पवार यांच्या अचानक निधनामुळे नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सध्या पक्षात कोणताही नैसर्गिक आणि सर्वमान्य नेता दिसत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षातील अजित पवार यांच्या जवळच्या एका वरिष्ठ नेत्याच्या मते, पक्षाचे नेतृत्व सध्या जयंत पाटील किंवा सुनील तटकरे यांच्याकडे जाऊ शकते. दोन्ही नेते भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्यात संपर्क म्हणून काम करत होते.

जयंत पाटील हे ३० वर्षांहून अधिक काळ आमदार आहेत आणि महाराष्ट्र सरकारमध्ये विविध विभागांमध्ये मंत्री म्हणून काम केले आहे. ते एक वरिष्ठ नेते आहेत. सुनील तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे एकमेव लोकसभा खासदार आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत.

अजित पवारांच्या गटाचा पुढचा नेता कोण असेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस हा एक प्रादेशिक पक्ष आहे. लहान पक्षांमध्ये, नेत्याच्या कुटुंबाचा प्रभाव असतो. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार किंवा त्यांचा मुलगा पार्थ पवार हे देखील पक्षाचे नेतृत्व घेऊ शकतात.

अजित पवार यांचे जवळचे सहकारी आणि माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांचाही गटात प्रभाव आहे. खासदार सुनील तटकरेंसारखे ज्येष्ठ नेते आहेत, त्यामुळे कुटुंबातील नवीन नेता नियुक्त करण्याऐवजी, या नेत्यांपैकी एक पक्षाची सूत्रे हाती घेण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची निवड केली जाऊ शकते अशी शक्यता आहे. सुनेत्रा स्वतः एका राजकीय कुटुंबातून येतात. त्या महाराष्ट्राचे माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या बहिण आहेत आणि राजकीय व सामाजिक जीवनात दीर्घकाळ सक्रिय आहेत.

२०२४ मध्ये, त्यांनी राष्ट्रवादी (शरद पवार गट) उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात बारामती लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी (अजित पवार गट) च्या तिकिटावर निवडणूक लढवली. सुनेत्रा या निवडणुकीत जवळपास १.५ लाख मतांनी पराभूत झाल्या. सुप्रिया यांना सुमारे ७.३ लाख मते मिळाली, तर सुनेत्रा यांना ५.७ लाख मते मिळाली. त्यानंतर, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून सुनेत्रा पवार राज्यसभेच्या खासदार म्हणून निवडून आल्या.

पक्षातील नेतृत्वाच्या संकटामुळे, उपमुख्यमंत्री म्हणून तात्काळ नवीन चेहरा नियुक्त करणे सोपे होणार नाही. सध्याच्या राजकीय परिस्थितीत, पक्षाला प्रथम संघटनेचे नेतृत्व कोण करेल हे ठरवावे लागेल.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याचे म्हणणे आहे की अजित पवार यांच्या पत्नी पक्षात फारसे सामील होऊ शकल्या नाहीत, परंतु आता सहानुभूतीमुळे त्यांच्यासाठी एक शक्यता निर्माण होत आहे. सध्या त्यांचे पुत्र पार्थ



पवार यांना कोणतीही मोठी जबाबदारी किंवा उपमुख्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता कमी आहे.

उपमुख्यमंत्रीपद अजित पवार गटाकडे होते. जर पक्षातील सर्व नेत्यांनी एकमताने पदाची मागणी केली तर सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री बनवता येईल. तथापि, अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये, उपमुख्यमंत्रीपद पवार कुटुंबाबाहेरील वरिष्ठ नेत्यांना देण्याचा ट्रेंड राहिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक सदस्य छगन भुजबळ यांनी १९९९ ते २००३ आणि २००९ ते २०१० या काळात दोनदा उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. आर.आर. पाटील यांनी २००४ ते २००८ या काळात उपमुख्यमंत्री म्हणूनही काम पाहिले.

अजित पवार यांच्या अशा अचानक जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार आणि अजित पवार गट आता पुन्हा विलीन होऊ शकतात का? हा प्रश्न सद्धया सर्वाधिक चर्चीला जात आहे.

२०२३ मध्ये अजित पवार त्यांचे काका शरद पवारांपासून वेगळे झाले, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एक मोठा गट तयार झाला आणि भाजप-शिवसेना (शिंदे गट) सोबत महायुती युतीत सामील झाले. २०२४ मध्ये निवडणूक आयोगाने या गटाला मूळ राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव, घड्याळ चिन्ह आणि अधिकृत पक्षाचा दर्जा दिला. शरद पवार गटाला आता राष्ट्रवादी (शरद पवार) म्हणून ओळखले जाते.

गेल्या काही महिन्यांपासून अजित पवार आणि शरद पवार यांच्यात चर्चा सुरू होती आणि दोघांनीही अजित पवारांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याचे मान्य केले होते. दोन्ही गट एकत्र आल्यामुळे, अजित पवार पूर्ण संघटनात्मक नियंत्रण राखतील असे मानले जात होते.

विलिनीकरणाबाबत दोन्ही गटांमध्ये अंतर्गत करार झाला होता. अजित पवार, शरद पवार आणि दोन्ही गटातील काही वरिष्ठ नेत्यांमध्ये सुमारे १० दिवसांपूर्वी एक बैठक झाली होती. या बैठकीत असे ठरले की येत्या काही महिन्यांत दोन्ही राष्ट्रवादी तांत्रिकदृष्ट्या एकत्र येतील आणि संपूर्ण नेतृत्व अजित पवारांकडे जाईल. शरद पवार यांनीही यावर सहमती दर्शविली असल्याचे मानले जात आहे.

तथापि, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येऊ शकतात अशी चर्चा बऱ्याच काळापासून पसरली होती, परंतु शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे आणि जितेंद्र आव्हाड यांसारखे ज्येष्ठ नेते विलीनीकरणाला विरोध करत आहेत. तरीही, जर शरद पवार यांनी विलीनीकरणाचा निर्णय घेतला तर कोणीही ते नाकारणार नाही.

खरं तर, सुप्रिया सुळे म्हणत आहेत की राष्ट्रवादी काँग्रेसची मूळ विचारसरणी धर्मनिरपेक्षता आणि प्रादेशिक मुद्दयांवर आधारित आहे, जी भाजपशी जुळत नाही. त्या २०२३ मध्ये अजित पवारांनी स्वतंत्र गट स्थापन करणे हा विश्वासघात म्हणतात. अशा परिस्थितीत, अजित पवार गटातील नेते भाजप आणि शिवसेना शिंदे गट सोडून शरद पवार गट आणि काँग्रेसच्या महाविकास आघाडीत सामील झाले तरच अजित पवार गटात विलीनीकरण होऊ शकते.

जितेंद्र आव्हाड हे अजित पवारांवर शरद पवारांना काढून पक्ष ताब्यात घेतल्याचा आरोप करतात. ते २०२३ च्या विभाजनाला षड्यंत्र म्हणतात. आव्हाड यांच्याव्यतिरिक्त, शरद पवार गटातील रोहित पवार आणि उत्तम जानकर यांसारखे अनेक नेते देखील दोन्ही गटांच्या विलीनीकरणाला विरोध करतात.

अजित पवारांच्या निधनानंतर त्यांचा पक्ष कमकुवत होईल का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. अजित पवारांमध्ये अनेक उणीवा होत्या. त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. तथापि, अजित पवार यांनी महाराष्ट्राचे सर्वात जास्त काळ उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. ते प्रशासकीय बाबींमध्ये कुशल होते.

ते आपल्या कार्यकर्त्यांसाठी वेळ देणारे नेते होते. त्यामुळे त्यांच्या गटातील राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना मजबूत आहे. काही नेते पक्ष सोडून गेले तरी त्यांच्या निधनानंतर पक्षाचे विघटन होईल असे म्हणता येणार नाही. त्यांचे दोन पुत्र आणि पक्षात असे अनेक नेते आहेत, जे पुढे येऊन पक्षाला बळकटी देतील.

**भाजपासोबत तणाव?**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणतात, भाजप आणि अजित पवार यांच्यात उघड संघर्ष नव्हता. त्यांनी त्याचे वर्णन 'मैत्रीपूर्ण लढाई' असे केले. स्थानिक निवडणुकांमध्ये, विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड भागात धोरणात्मक फरक दिसून आले, परंतु नंतर दोन्ही बाजूंनी परिस्थिती सोडवली. त्यांच्या मते, ही युती तुटण्याची परिस्थिती नव्हती.

खरं तर, गेल्या काही महिन्यांत, भाजपच्या नेतृत्वातील महायुती आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्यात संघर्षाच्या अनेक घटना घडल्या आहेत.

जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या महाराष्ट्र महानगरपालिका निवडणुकीदरम्यान, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महायुतीच्या उमेदवारांमध्ये थेट लढत झाली.

शिवसेना दोन गटात विभागल्यानंतर ही पहिलीच बीएमसी निवडणूक होती. पुण्यात भाजप युतीपासून वेगळे निवडणूक लढवण्याबाबत अजित पवार म्हणाले होते की, आम्ही केंद्रातील एनडीए सरकारचा भाग आहोत आणि राज्यात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि मी एकत्र सरकार चालवत आहोत. तथापि, आम्ही पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्रपणे निवडणुका लढवत आहोत.

अजित पवार म्हणाले होते, असे यापूर्वीही घडले आहे. त्यावेळी राज्यात एमव्हीए सरकार सत्तेत होते आणि केंद्रात यूपीए सरकार होते.

मनमोहन सिंग पंतप्रधान होते आणि सुशील कुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण आणि विलासराव देशमुख यांसारख्या नेत्यांनी वेगवेगळ्या वेळी राज्याचे नेतृत्व केले. तरीही, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्थानिक मुद्द्यांवर स्वतंत्रपणे लढवल्या गेल्या, अनेकदा एकमेकांविरुद्ध.

त्यानंतर, भाजपने काही भागात राष्ट्रवादीच्या नेत्यांना पक्षात सामील केले, ज्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असंतोष वाढला. अजित पवारांनी अनेक प्रसंगी आघाडीला सत्तेची भूक असे संबोधले. रवींद्र चव्हाण आणि चंद्रशेखर बावनकुळे यांसारख्या भाजप नेत्यांनी अजित पवारांविरुद्ध विधाने केली.

त्यानंतरच्या महापालिका निवडणुकीत, भाजपने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील पवार कुटुंबाचा बालेकिल्ला तोडला. अजित पवार आणि शरद पवार यांनी युती केली, पण त्यांना पराभव पत्करावा लागला. पुणे महानगरपालिकेत भाजपने ११९ जागा जिंकल्या, तर अजित पवार गटाने २७ आणि शरद पवार गटाने ३ जागा जिंकल्या. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपने ८४ जागा जिंकल्या, ज्यामुळे पवारांचा त्यांच्या बालेकिल्ल्यात पराभव झाला.

खरं तर, अजित पवारांचा गट आणि भाजप युती जागावाटपाबाबत एकमत होऊ शकले नाही. अजित पवार गटाने अधिक जागांची मागणी केली होती, जी भाजप पूर्ण करण्यास तयार नव्हता. शिवाय, २०२४ मध्ये अजित पवार गटाशी युती केल्यानंतर, लोकसभा निवडणुकीत भाजपची जागा संख्या ९ वर घसरली.

आरएसएसचे सदस्य भाजप-राष्ट्रवादी आघाडीवरही नाराज होते. आरएसएसचे मुखपत्र ऑर्गनायझरने भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या अजित पवारांशी युती केल्याबद्दल भाजपवर टीका केली. तथापि, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुती (महायुती) च्या पाठिंब्यानंतर, या चर्चांना पूर्णविराम मिळाला.

अजित पवारांच्या भाजप आघाडीशी असलेल्या संबंधात कोणतीही कटुता नव्हती. नागरी निवडणुकीत पक्षांच्या व्होट बँक वेगळ्या राहतात. मुंबईत अजित पवार गटाचा प्रभाव नव्हता. तथापि, पुण्यात त्यांना काँग्रेसची प्रगती थांबवायची होती. म्हणून त्यांनी स्वतःच सांगितले की ते धोरणात्मकरित्या स्वतंत्रपणे लढत आहेत.

दादांना जावून तीन दिवस झालेत. पवार कुटुंबात अद्यापही शोकमय वातावरण आहे. दशक्रिया, तेरावी, चौदावी आणि अन्य कार्यक्रम होणे बाकी आहे. अशा स्थितीत दादांच्या जागी कोण? राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाचे विलीनीकरण यावर इतक्या लवकर काही निर्णय होण्याची शक्यता तशी कमी आहे.

# गांधी विचारांचे अमरत्व!



प्रा. डॉ. विजय चव्हाण
म. गांधी कनिष्ठ महाविद्यालय,
गांधींग्राम, अकोला.
9545217147

सत्य, अहिंसा आणि शांतीचे प्रतिक म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या महात्मा गांधीची ३० जानेवारी १९४८ रोजी बंदुकीच्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली.तो दिवस हुतात्मा दिनम्हणून पाळला जातो.

खरे तर, गांधीजींच्या हत्येने एका तेजोमय जीवनाचा अंत झाला. एक व्यक्ती म्हणून गांधी आणि गांधी युग संपले मात्र,त्यांच्या विचारांचे युग संपले नाही आणि भविष्यात जोपर्यंत या धर्तीवर माणूस नावाचा प्राणी अस्तित्वात राहील, तोपर्यंत गांधीजींचे विचार आपल्याला संपविता येणार नाही.

सत्य, अहिंसा, प्रेम धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा, लोकशाही इत्यादी राष्ट्रीय मूल्याना महत्त्व देणारे महात्मा गांधी हे केवळ भारताच्या स्वतंत्र्य लढ्याचे नेते नव्हते; तर, सम्पूर्ण जगात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करणारे, स्वातंत्र्यासाठी निशस्त्र माणसांना संघटीत होण्याचा मार्ग दाखविणारे द्रष्टे महापुरुष होते.

बॅरिस्टरची पदवी मिळविणाऱ्या गांधीजीची जेंव्हा दक्षिण आफ्रिकेत 'काळा इसम' अशी संभावना करण्यात आली, गोऱ्या अधिकाऱ्यांनी जेंव्हा त्यांना त्यांच्या सामानासकट रेल्वेतून खाली फेकून दिले, त्यांचा छळ केला, खऱ्या अर्थाने तेथेच नवा गांधी जन्माला आला.

दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर गांधीजीनी देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी रक्त न सांडता शांततेच्या मार्गाने सामान्य माणसाच्या सहनशक्तीचे संघटन केले आणि कटयातूनच त्यांनी अहिंसा व सत्याग्रह या दोन नव्या व अभिनव शस्त्राची निर्मिती केली.

त्यांची ही दोन शस्त्रे ऐवढे प्रभावी आणि शक्तिशाली निघाली की,त्यापुढे ज्या साम्राज्यावरून कधीही सूर्य मावळत नव्हता ते ब्रिटिश साम्राज्य पराभूत झाले. परिणामतः त्यावेळी केवळ भारतालाच नव्हे, तर जगातील ब्रम्हादेश, श्रीलंका, दक्षिण आशियातील व आफ्रिकेतील अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले. राजा, सेनापती, धर्मसंस्थापक किंवा सत्ताधारी नसलेल्या एका सामान्य व्यक्तीची ही असामान्य किमयाच होती.

भारत देश हा जगामध्ये ज्या आदर्शासाठी व मूल्यासाठी प्रसिद्ध आहे; तो भारत घडविण्याची ताकत गांधीजीच्या विचारात आहे. काळ्याफिती लावून काम करणे, लेखनी बंद अंदोलन करणे, शांततेच्या मार्गाने उपोषण करणे इत्यादी निषेध नोंदविण्याच्या या ज्या पद्धती आहेत त्या गांधीजीचीच देन आहे.

परंतू आज आम्हाला गांधीजीनी सांगितलेल्या मानवतावादी विचारांचा विसर पडला आहे. वाईट बोलू नये, वाईट ऐकू नये आणि वाईट पाहू नये असा संदेश देणारी गांधीजींची तीन माकडे आज लोप पावत गेली आहे. त्यामुळे लोकशाहीप्रधान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतात राजकारणाची पातळी घसरली आहे.

नैतिकतेचा पाया असलेले नेते दुर्मिळ होत चालले आहे. सत्य, अहिंसा या तत्वाला बाजूला सारून सत्ता काबीज करण्यासाठी समाजाची दिशा भूल केली जात आहे. जाती- धर्माच्या आणि कर्मकांडाच्या नावाखाली सामाजिक सलोखा बिघडविल्या जात आहे.

अन्याय, अत्याचार आणि स्त्रियांवरील बलात्काराच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होवून अलीकडच्या काळात तर कोरोना सारखे असाध्य रोग बळकावत चालले आहे.आणि हीच परिस्थिती निकोप समाज विकासाला व देशाच्या प्रगतीला अडथळा निर्माण करीत आहे.

समाजातील या वाईट प्रवृत्तीना आळा घालण्यासाठी, द्वेषाच्या भिंती पाडून प्रेमाचे साम्राज्य उभे करण्यासाठी, आदर्श समाज रचना आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार करण्यासाठी आपल्याला गांधीजीनी सांगितलेली एकादशव्रत, विधायक कार्यक्रम, सत्य आणि अहिंसेबाबतचे तत्वज्ञान समजून घ्यावे लागेल.एवढेच नव्हे तर, जागतिक पातळीवरील विविध समस्यांना आणि आवाहनांना सामोरे जाताना गांधीजींनी सांगितलेली नैतिक मूल्य मार्गदर्शक ठरणार असल्याने, गांधीजीनी मांडलेली पयार्यी समाज रचनेची आणि सर्वोदयाची संकल्पना समजून घेवून ती आचरणात आणावी लागेल.

महात्मा गांधी हे सत्य,अहिंसा, सर्वधर्म समभाव आणि देशाचा सर्वसमावेशक विचार करणारे समतावादी महापुरुष होते. मात्र, जात्यांध आणि धर्मांध विचाराच्या लोकांना त्यांचे हे विचार पटणारे नव्हते. म्हणून तर एकारल्या विचाराने वेडे झालेल्या एका माथेफिरुनी गांधींवर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली.

त्यांचा देह अनंतात विलीन झाला. एक व्यक्ती म्हणून गांधी युग संपले मात्र त्यांच्या विचारांचे युग संपले नाही आणि भविष्यात ते कधी संपणारही नाही. कारण साऱ्या जगाने आज गांधी विचार हे युद्धाला पर्याय म्हणून स्वीकारले आहेत.त्यामुळे गांधीजी सारखी माणसे देहाने जातात. मात्र त्यांचे विचार अजरामर राहतात.

■ ■ ■

# पुन्हा सेंद्रिय शेतीकडे वळावे लागणार!

गेल्या काही वर्षांपासून आपल्या देशात शेतीमध्ये मोठ्याप्रमाणात रासायनिक खते व औषधांचा सर्रास वापर केला जातो. भरघोस पीक घेण्याच्या नादात आपण मानवी जीवनाला हानिकारक असलेली रासायनिक शेतीची पद्धत, स्विकारली आहे. त्याचे दुष्परिणाम जाणवू लागल्यानंतर आता आपण हळूहळू सेंद्रिय खतांकडे वळू लागलो आहोत. हे चित्र आशादायक असून नापिकी व रासायनिक खते/औषधे वापरल्यामुळे उद्भवणारे आजार, यांस काही प्रमाणात पायबंद बसू शकतो. सरकारने, शेतकऱ्यांनी रासायनिक खते व औषधे टाळावीत, यासाठी गावागावात जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे.

-------------------



फ्रंटलाईन
दीपक मोहिते
९०११०५५४१३
९५४५८००६६६

हल्ली मातीच्या चुलीवरील मटण, मातीच्या भांड्यात जेवण,असे फलक आपण महामार्गावर सतत पाहत असतो, आपण पुन्हा जुन्या चालीरीतीकडे वळू लागलो आहोत. तसेच काही शेतकरी रासायनिक खते व औषधे टाळून सेंद्रिय शेती करू लागले आहेत. सरकारने या ज्वलंत विषयी पुढाकार घेण्याची गरज आहे. शेती व पाणी,यावर मानवी जीवन अवलंबून आहे. पण अधिक उत्पादन घेण्याच्या नादात आपण आता विनाशाच्या वाटेवर निघालो आहोत.

कृषिप्रधान देश म्हणून आपल्या देशाची जगात ओळख आहे. गेल्या आठ दशकात कृषी क्षेत्रात विविध तंत्रज्ञान व संशोधन करत आपण अधिक कृषी उत्पादन घेण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये आपण यशस्वी देखील झालो. पण त्याचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतील,असे वाटले नव्हते.

जमिनीची धूप व जमिनीचा पोत नष्ट होणे,अशा दोन कारणांमुळे अनेक भागातील शेती आता उजाड होत चालली आहे. हा गंभीर धोका लक्षात घेऊन सरकारने याविषयी पावले उचलण्याची गरज आहे.

रासायनिक खतासोबत कीटकनाशक औषधांचा वापरही अनिष्ट परिणामाला आमंत्रण देणारे आहे. पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव झाला की आपण कीटकांना मारण्यासाठी औषधांची फवारणी करतो, कीटक मरतात, पण हीच औषधे मानवी जीवनाला हानिकारक ठरतात. त्यामुळे पूर्वी जी सेंद्रिय पद्धतीने शेती होत होती, ती आता पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न होत आहे. महाराष्ट्रात सेंद्रिय शेतीला उत्तेजन देणाऱ्या दोन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यापैकी पहिली योजना वसंतराव नाईक शेती स्वावलंबन अभियानंतर्गत राबवण्यात येत आहे. सेंद्रिय शेतीमध्ये पिकांचे अवशेष, शेण, गोमूत्र व नैसर्गिक साधनांचा वापर करण्यात येत असतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकरी केवळ शेणखत वापरत असत,तसेच कोणतीही प्रक्रिया न केलेली बी-बियाणे वापरण्यात येत असत.त्यामुळे जमिनीची सुपीकता व पिकांची गुणवत्ता वाढत असे. त्याकाळी उच्च प्रत व मानवी जीवनाच्या आरोग्यास पोषक असणाऱ्या उत्पादनाची निर्मिती होत होती.त्यानंतर हरितक्रांतीचे वारे वाहू लागले व रासायनिक खतांचा वापर वाढत गेला.उत्पादनात वाढ झाली, पण दर्जा मात्र खालावत गेला. हे जे स्थित्यंतर झाले ते कृषिक्षेत्राला हानिकारक ठरले.

सेंद्रिय शेती म्हणजे मानवी जीवनचक्र लक्षात घेऊन रासायनिक खतांचा वापर टाळणे होय.या महत्वाच्या विषयाकडे सिक्कीम या राज्याने गांभीर्याने पाहिले व त्या सरकारने संपूर्ण राज्य सेंद्रिय शेतीखाली आणण्याचे ठरवले. अल्पावधीत ते प्रत्यक्षात यशस्वी करून दाखवले. देशात सिक्कीम हे सेंद्रिय शेती करणारे प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले. जर पहाडी प्रदेशात असलेले सिक्कीम हे सहजशक्य करू शकते, तर आपण का करू शकत नाही.

आजच्या घडीला जगातील ११० देशांनी सेंद्रिय शेती पद्धत अवलंबली आहे.या पद्धतीमुळे शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढून मानवाचे आरोग्य सुधारते. रासायनिक खते व हानिकारक कीटकनाशके याचा सर्रास वापर होत असल्यामुळे यापूर्वी कधीही न ऐकलेले रोग व आजार, आपण हल्ली अनुभवतोय. त्यामुळे आता शेणखत, गांडूळ, हिरवळ, हाडे, तेलबियांची पेंड व माश्याचे खत, वापरण्यास सुरूवात झाली आहे. अशा खतांमुळे जमिनीचा पोत सुधारतो व ती सुपीक बनते.

पूर्वी शेतकरी लाकडाच्या नांगराने शेत नांगरत असत, नंतरच्या काळात लोखंडी नांगर आला. आता मात्र ट्रॅक्टरचा वापर सुरू झाला आहे. लाकडी व लोखंडी नांगराने जमीन नांगरणे कठीण झाले आहे.

रासायनिक खतांच्या वापरामुळे जमीन कठीण म्हणजे मृत झाली आहे. त्यामुळे पारंपारिक पद्धतीने जमीन नांगरणे, अशक्य झाले आहे. आपल्या देशातील अनेक राज्ये जास्त उत्पादन घेण्याच्या हव्यासापोटी रासायनिक खतांचा सर्रास वापर करत असतात. त्यामुळे कॅन्सर, मूत्रपिंड निकामी होण्याचे प्रकार वाढीला लागले आहेत.

अनेक पाश्चात्य देशांनी हा धोका वेळीच ओळखला व ते सेंद्रिय शेतीकडे वळले.त्यामध्ये अमेरिका, जर्मनी, इंग्लड, फ्रान्स, इटली, बेल्जियम, चीन, इस्त्रायल, युक्रेन व इंडोनेशिया, या देशांचा समावेश आहे.

आपल्या देशातही आता शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळू लागले आहेत. सरकारने अशा पद्धतीच्या शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. निसर्गाच्या जीवनशैलीवर अवलंबून असलेल्या या पद्धतीमुळे जीवसृष्टीला धोका होत नाही, तसेच प्रदूषण होत नाही.

सेंद्रिय शेती करण्यामागे जमिनीचा पोत, हवा, माती याचे आरोग्य टिकवणे, असा उद्देश आहे.रासायनिक खते खरेदी करणे, शेतकऱ्यांच्या आवाक्याच्या बाहेरचे असते, पण उत्पन्नवाढीच्या हव्यासापोटी तो त्याचा वापर करतो. सेंद्रिय खतासाठी जो खर्च येतो, त्याच्या दुपट्ट त्याला रासायनिक खतासाठी खर्च करावा लागतो. त्यामुळे सरकारने सेंद्रिय खतांची निकोप शेतीसाठी असलेली गरज लक्षात शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे, अनिवार्य आहे.

सरकारने राज्याराज्यात कृषी विद्यापीठे उभारून कृषी क्षेत्राला उभारी मिळवून दिली आहे, पण या ज्वलंत प्रश्नी सरकार फारसे काही करू शकले नाही. जमिनीतील मातीचे संरक्षण करणे, ही काळाची गरज आहे.

जमिनीतील मातीच्या थराचे जतन व संवर्धन, या विषयी शेतकऱ्यांमध्ये जागृती झाली तर जमिनीचा पोत टिकून राहील. जसं जल हे मानवी जीवनाला आवश्यक आहे,तसेच जमिनीतील माती, ही देखील तितकीच आवश्यक आहे.

सेंद्रिय शेतीच्या पद्धत अवलंबल्यामुळे पारंपारिक बी-बियाणे याचा वापर, जमिनीची धूप रोखणे, जमिनीची नांगरणी करणे, इ. शेतीची कामे सुलभरीत्या होतात व अशाप्रकारची शेती करणे, शेतकऱ्यांना परवडते. येणाऱ्या काळात अनेक देश सेंद्रिय शेती पद्धत अवलंब करत आपले उत्पादन वाढवतील, असा अंदाज आहे.

अधिक उत्पन्न घेण्याच्या नादात आपण मानवी जीवन संकटात ढकलत आहोत, याची जाणीव आता शेतकऱ्यांना होऊ लागली आहे, हे महत्वाचे आहे.पण सरकारनेही त्याला सकारात्मक प्रतिसाद देणे गरजेचे आहे.

-------------------------

(लेखक हे महासागर मिडीया ग्रुपचे पालघर येथील निवासी संपादक आहेत.)

## क्राईम कॅपिटलकडे वाटचाल?

वाचक लिहितात

राज्याच्य उपराजधानीचे शहर नागपूरची वाटचाल आता क्राईम कॅपिटल म्हणजेच गुन्ह्यांच्या राजधानीच्या दिशेने होऊ लागल्याचे स्पष्ट दिसून येते. टीव्ही, न्युज पोर्टलवरच्या बातम्या बघा किंवा सकाळी येणारे वृत्तपत्र उघडून पहा, शहरात कुठेना कुठे खून झाल्याच्या बातम्या दिसतात.

काही दिवसांपूर्वी तर शहरात आणि लगतच्या भागात एकाच दिवशी तीन खून झाल्याचे वाचण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री नागपूरचे आहेत. असे असतानाही गृह खात्याच्या अखत्यारीत येणारा पोलीस विभाग डोळे मिटून कसा आहे. अर्थात, खून व तत्सम गुन्हे घडण्यामागे विविध कारणे असतात आणि होणाऱ्या गुन्ह्यांना पोलीस थांबवू शकत नाही. तथापि, गुन्हेगारांना जरब वाटेल, असा पोलीस विभागाचा वचक असावा लागतो. अनेक राजकीय लोकांनी गुंड पोसले असल्याने पोलीसही हतबल असावेत. नागपूरचा मानाचा दर्जा कायम ठेवायचा असेल तर गुन्हेगारी थांबवावी लागेल.

■ रोशन जवादे, नागपूर.

## प्लास्टिकच्या बाटलीतले पाणी आरोग्यासाठी घातक



आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण अनेकदा छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष द्यायला विसरतो, ज्या नंतर मोठी समस्या बनू शकतात. त्यापैकीच एक म्हणजे कारच्या आत ठेवलेली पाण्याची बाटली. अनेकदा असे घडते की आपण प्रवासादरम्यान कारमध्ये पाण्याची बाटली सोडतो.

पुढच्या वेळी जेव्हा आपल्याला तहान लागते तेव्हा आपण जास्त विचार न करता त्याच बाटलीतून पाणी पितो, कारण पाणी स्वच्छ दिसते आणि वास येत नाही, परंतु प्रश्न असा आहे की, गाडीत ठेवलेले पाणी खरोखरच पिण्यायोग्य आहे का? बाटलीवर लिहिलेली एक्सपायरी डेट सर्व काही ठरवते की कारच्या आतील वातावरणाचाही पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होतो?

विशेषतः उन्हाळ्यात, जेव्हा कार उन्हात पार्क केली जाते आणि आतील तापमान खूप जास्त होते, तेव्हा हा प्रश्न आणखी महत्त्वाचा ठरतो. डॉक्टरांचे म्हणणे आहे की कारमध्ये ठेवलेले जुने पाणी हळूहळू तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. जरी पाणी बाहेरून सामान्य वाटत असले तरी त्यामध्ये अशी रसायने आढळू शकतात जी दीर्घकाळापर्यंत शरीराला हानी पोहोचवतात.

खरं तर, पाणी स्वतःच संपत नाही, परंतु ज्या बाटलीत ते ठेवले जाते ती सर्वात मोठा घटक बनते. जेव्हा प्लास्टिकची बाटली सतत उष्णता सहन करते, तेव्हा तिची सामग्री हळूहळू कमकुवत होऊ लागते. जर कार उन्हात पार्क केली गेली तर आतील तापमान ६० डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते. अशा परिस्थितीत प्लास्टिकच्या बाटलीतील रसायने पाण्यात विरघळू लागतात.

जर एखादी प्लास्टिकची बाटली १-२ दिवस कारमध्ये पडून असेल आणि कार उन्हात उभी असेल तर पाणी पिणे सुरक्षित मानले जात नाही. कित्येक दिवस ठेवलेले पाणी आणखीनच धोकादायक बनते. तज्ञांच्या मते, कारमध्ये ठेवलेली एक जुनी पाण्याची बाटली तुमच्यासाठी सर्वात धोकादायक पेय बनू शकते. उष्णतेमुळे प्लास्टिकचा ऱ्हास होऊ लागतो आणि त्यातून बाहेर पडणारी रसायने शरीराच्या संप्रेरक प्रणालीवर परिणाम करू शकतात. बाटलीतील तोंडातून जाणारे बॅक्टेरिया गरम वातावरणात वेगाने वाढतात. यामुळे पाणी शिळे तर होतेच, पण आरोग्यासाठीही हानीकारक होते.

**कारमध्ये पाणी पिण्याचे काय तोटे आहेत?**

कारमध्ये ठेवलेले जुने पाणी पिण्यामुळे तात्काळ आणि दीर्घकालीन नुकसान होऊ शकते. डोकेदुखी आणि गोंधळ ओटीपोटात दुखणे, गॅस किंवा अतिसार घशात खवखव थकवा आणि सुस्तपणा दीर्घकाळापर्यंत हार्मोनल समस्या विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्यांसाठी हे अधिक धोकादायक ठरू शकते.


**मिनरल वॉटरची बाटली सुरक्षित आहे का?**

अनेकदा लोकांना असे वाटते की, मिनरल वॉटरची सीलबंद बाटली गाडीत ठेवली असली तरी ती सुरक्षित आहे. परंतु वास्तविकता अशी आहे की बाटली कोणत्याही ब्रँडची असली तरी प्लास्टिक तेच राहते. गरम केल्यावर, प्रत्येक प्लास्टिकमधून रासायनिक सोडण्याचा धोका असतो.

त्यामुळे जर मिनरल वॉटर गरम कारमध्ये कित्येक तास किंवा दिवस पडून असेल तर ते पिणे योग्य मानले जात नाही. प्लास्टिकऐवजी स्टील किंवा काचेची बाटली वापरा, दररोज ताजे पाणी भरा, रात्रभर किंवा बरेच दिवस कारमध्ये पाणी सोडू नका, अर्धवट बाटली पुन्हा वापरू नका.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### निती व नियती..!

येती जीवनात असे प्रसंग
जेंव्हा मोह होतो शिरजोर
समजत असुनही मानव
निती आचरण्या पडतो कमजोर..

इथेच आपल्या अधोगतीची
बिजे जाती रोवले
यथायोग्य समय येता
भोगावी लागे कर्माची फळे.

नियतीचे सिध्दांत अटल
त्यात होत नाही बदल
कालमान , देश असो कोणताही
नियती घेते त्याची दखल .

चिंतन व मनाचा ब्रेक
ढळू देत नाही संतुलन
अध्यात्माची कास धरा
सांगे भगवद्गीता व संतजण .

# दुचाकी ट्रॅक्टर ट्रॉलीवर धडकली, दोघे ठार

## निभोंरा फाट्यावर भीषण अपघात





**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.30 )**- शुक्रवारी (30 जानेवारी 2026) सायंकाळी साडेसातच्या सुमारास खरपी-बहिरम मार्गावरील निभोंरा फाटा येथे भीषण अपघात घडला. रस्त्यावर पंचर अवस्थेत उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला मागून धडक दिल्याने दुचाकीवरील दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

एमपी 48 झेडडी 0212 क्रमांकाच्या दुचाकीवरून जाणारे विजय झर्री कास्देकर (वय 22) आणि शिवलाल हिरालाल धाडसे (वय 55, दोघेही रा. लोपईठाना, ता. आठनेर, जि. बैतूल) हे अपघातात गंभीर जखमी झाले. अपघात इतका भयानक होता की दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला.अपघातानंतर मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे नेले गेले. मृतकांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली असून, अपघातग्रस्त दुचाकी आणि ट्रॅक्टर शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांनी या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तसेच, रस्त्यावर सुरक्षिततेची काळजी न घेतल्याने वाहने अपघातास कारणीभूत ठरत असल्याचा मुद्दा पुन्हा एकदा सामोरासमोर आला आहे.

# आ.लवटे यांच्या मध्यस्थीने सरपंच थोरात यांच्या उपोषणांची सांगता

## रस्ता दुरुस्तीचे लेखी आश्वासन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )** -गावंडगाव व पंचक्रोशीतील रस्त्यांच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गावंडगावचे सरपंच सुनील थोरात यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण अखेर यशस्वीरीत्या संपन्न झाले. आमदार गजानन लवटे (दर्यापूर मतदारसंघ) यांच्या मध्यस्थीने प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्यानंतर, गुरुवारी (दि. 29) सायंकाळी 6 वाजता थोरात यांनी निंबू-पाणी स्वीकारून उपोषण मागे घेतले.

प्रजिमा 11 व 12 अंतर्गत सातेगाव फाटा-वनोजाबाग तसेच रहिमापूर-चिंचोली ते गावंडगाव-काळगव्हाण या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, ही उपोषणामागील प्रमुख मागणी होती. खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. यावेळी बांधकाम विभागाचे उपअभियंता नरेश अघम यांनी लेखी पत्र देत रस्त्यांचे प्रस्ताव सादर करून मंजुरीनंतर तातडीने डांबरीकरण व नूतनीकरणाचे काम सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या उपोषणाला माजी मंत्री बच्चू कडू यांनी भेट देत पाठिंबा दर्शविला. विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपोषणाची सांगता श्रद्धांजली व राष्ट्रगीताने करण्यात आली. यशस्वी तोडग्यानंतर परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

## वसतिगृहातून 40 पंख्यांची चोरी

**अमरावती** - गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व्हीएमव्ही कॉलेज कॅम्पसमधील अल्पसंख्याक वसतिगृहातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे 12 हजार रुपये किमतीचे 40 छताचे पंखे चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कनिष्ठ लिपिक अमितकुमार नकाशे यांनी गुरुवारी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## पोलिसांचा दारू विक्रीवर छापा

**अमरावती** - बडनेरा पोलीस ठाणे परिसरातील सावता मैदान परिसरात बुधवारी रात्री उशिरा पोलिसांनी बेकायदेशीर दारू विक्रीवर छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत सुमारे 1 हजार रुपये किमतीच्या देशी दारूच्या 25 बाटल्या जप्त करण्यात आल्या.

# धनेगाव येथील सरपंच निलू येवले पदावरून पायउतार




**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )** - तालुक्यातील धनेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच निलू अजय येवले यांना सरपंच पदावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. त्या 11 फेब्रुवारी 2021 पासून सरपंच पदावर कार्यरत होत्या.

स्थानिक पातळीवरील राजकीय समजुतीनुसार अडीच-अडीच वर्षांचा सरपंच पदाचा कार्यकाळ ठरविण्यात आला होता. मात्र ठरलेल्या मुदतीनंतरही त्यांनी राजीनामा न दिल्याने ग्रामपंचायत स्तरावर राजकीय अस्वस्थता निर्माण झाली होती. दरम्यान, 15 ऑगस्ट 2022 रोजी ग्रामपंचायतीची कोणतीही पूर्वमान्यता न घेता तसेच स्थानिक पक्षाला विश्वासात न घेता ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या पतीकडून ध्वजारोहण करून घेतल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकारामुळे सरपंच पदाचा गैरवापर झाल्याचा मुद्दा पुढे आला. या पार्श्वभूमीवर उपसरपंच मुकुंद प्रभुदास येवले यांनी विभागीय आयुक्तांकडे सरपंच अपात्रतेची याचिका दाखल केली. याचिकेवर पंचायत समिती स्तरावर चौकशी करण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषद स्तरावर सुनावण्या होऊन प्रकरण अंतिम निर्णयासाठी विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून विभागीय आयुक्तांनी 16 जानेवारी 2026 रोजी उपसरपंच मुकुंद प्रभुदास येवले यांचा अर्ज मंजूर केला. त्यानुसार निलू अजय येवले यांना सरपंच पदासाठी अपात्र ठरवून सरपंच पदावरून पायउतार करण्यात आले.

## अल्पवयीन विद्यार्थिनीचा पाठलाग

**अमरावती** - नांदगाव खंडेश्वर तहसीलमधील मंगरूळ चावला येथे राहणाऱ्या अल्पवयीन मुलीचा एका तरुणाने पाठलाग करून त्रास दिल्याची घटना उघडकीस आली आहे. सदर मुलगी इयत्ता 11 वीमध्ये शिक्षण घेत असून कॉलेजला जात असताना 19 वर्षीय आरोपीने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. तसेच तिच्याशी एकत्र बाहेर जाण्याचा आग्रह धरून वारंवार त्रास दिल्याचे तिने तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकाराला कंटाळून अल्पवयीन मुलीने गुरुवारी नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# पुनरावृत्ती झाल्यास मेळघाटची जनता ते खपवून घेणार नाही!


## वाघांच्या हल्ल्यांवर आमदार केवलराम काळेंचा इशारा




**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.30 )** - मेळघाट परिसरात सातत्याने वाढत असलेल्या वाघांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांसह लोकप्रतिनिधींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मागील दीड वर्षात वाघांच्या हल्ल्यांच्या 6 ते 7 घटना घडल्या असून, अद्याप प्रभावी उपाययोजना न झाल्याने नागरिकांचा संयम सुटत चालला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार केवलराम काळे यांनी वन विभागाला कडक शब्दांत इशारा देत, अशा घटना पुन्हा घडल्यास मेलघाटची जनता ते खपवून घेणार नाही, असे स्पष्ट केले.

अलीकडेच वाघाच्या हल्ल्यात हीराबंबई येथील सीताराम बंसीलाल गूथरया यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. गुरुवारी आमदार केवलराम काळे यांनी हीराबंबई येथे जाऊन शोकसंतप्त कुटुंबीयांची भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले. यावेळी वन विभागाकडून मंजूर करण्यात आलेल्या 5 लाख रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आला. माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे 8 वाजता सुसर्दा वनपरिक्षेत्रातील हीराबंबई तलावाजवळील बुकली पोए परिसरात सीताराम हे हरवलेल्या बैलाचा शोध घेण्यासाठी गेले होते. त्यांच्यासोबत दोन मुले व एक भाचा होते. याचवेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला करून सीताराम यांना जंगलात फरफटत नेले. ही घटना मुलांच्या डोळ्यांसमोर घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. यापूर्वीही वाघांकडून जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मानवङ्कवन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या प्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष आप्पा पाटील, पश्चिम मंडळ अध्यक्ष बंसीलाल सेलूकर, पूर्व मंडळ अध्यक्ष गजु सुडस्कर, शहर अध्यक्ष विवेक नवलाखे, महामंत्री राजू बांगरे यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समयसागर महाराज यांचे मुक्तागिरी येथे ऐतिहासिक प्रथम आगमन





**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर ( दि.30 )** - मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यात वसलेले प्रसिद्ध श्री दिगंबर जैन सिद्धक्षेत्र मुक्तागिरी येथे येत्या 1 फेब्रुवारी 2026 रोजी आचार्य प्रवर प.पू. 108 श्री समयसागरजी महाराज यांचे 22 मुनी संघासह प्रथमच पावन आगमन होणार आहे. या आगमनामुळे मुक्तागिरी परिसरात भक्तीमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार असून या घटनेस विशेष धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

आचार्य श्री समयसागरजी महाराज हे आचार्य प्रवर प.पू. 108 विद्यासागरजी महाराज यांचे परम प्रभावक शिष्य व प्रथम दीक्षार्थी आहेत. विद्यासागरजी महाराज यांच्या समाधीनंतर संपूर्ण संघाचे आचार्यपद त्यांनी स्वीकारले असून, त्यांच्या मुक्तागिरीतील आगमनाकडे देशभरातील जैन समाजाचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर मुक्तागिरी सिद्धक्षेत्रात भव्य स्वागत व सुव्यवस्थित आयोजनासाठी जोरदार तयारी सुरू आहे. परतवाडा, अंजनगाव सुर्जी, अमरावती, कारंजा व बैतूल येथील कार्यकर्त्यांच्या सहभागातून स्वागत, व्यवस्था, निवास-भोजन, शिस्त-सुरक्षा व प्रसार-प्रसिद्धी अशा विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे आचार्य विद्यासागरजी महाराज यांचा मुक्तागिरी येथे 1980, 1990 व 1991 मध्ये चातुर्मास झाला होता. दीर्घ कालावधीनंतर त्यांच्या परंपरेतील आचार्य व विशाल मुनी संघाचे आगमन होत असल्याने भाविकांमध्ये मोठा उत्साह आहे. या ऐतिहासिक प्रसंगी राज्यासह देशभरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मुक्तागिरी सिद्धक्षेत्राच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

# राजस्थानमध्ये सरपंच प्रशासक, मग महाराष्ट्रात का नाही?

## ग्रामस्वराज्यावर दुहेरी धोरणाचा आरोप




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.30 )**- राजस्थान सरकारने ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर निवर्तमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला असताना, महाराष्ट्र सरकार मात्र लोकनियुक्त सरपंचांना डावलून शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्याच्या दिशेने जात असल्याचा आरोप सरपंच संघटनांनी केला आहे. यामुळे लोकशाही, ग्रामस्वराज्य आणि विकेंद्रीकरणाच्या तत्त्वांना तडा जाणार असल्याची चिंता व्यक्त होत आहे. राजस्थानच्या ग्रामीण विकास व पंचायती राज विभागाने 16 जानेवारी 2025 रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपत असून अपरिहार्य कारणांमुळे निवडणुका होऊ शकत नाहीत, तेथे निवर्तमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून जबाबदारी देण्यात येणार आहे. पंचायती राज अधिनियमातील तरतुदींचा वापर करून लोकनियुक्त नेतृत्वालाच प्राधान्य देण्यात आले आहे. याउलट महाराष्ट्रात शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचा विचार सुरू असल्याने संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके यांनी, राजस्थान सरकार लोकनियुक्त सरपंचांवर विश्वास ठेवते, मग महाराष्ट्र सरकारला तो विश्वास का नाही? असा सवाल उपस्थित केला.

संघटनांच्या मते, अधिकाऱ्यांच्या ताब्यात कारभार दिल्यास 'मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजना'सारख्या योजनांची अंमलबजावणी संथ होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले यांनी राजस्थानप्रमाणेच धोरण स्वीकारण्याची मागणी करत, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# घोडसगाव ग्रामपंचायत जिल्ह्यात प्रथम

## संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा निकाल जाहीर

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान
स्वच्छतेतून समृद्धीकडे

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.30 )** - संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सन 2025ङ्क2026 चा जिल्हास्तरीय निकाल जाहीर झाला असून, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील घोडसगाव ग्रामपंचायतीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) बाळासाहेब बायस व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पापुस्व) बाळासाहेब रायबोले यांनी विजेत्या ग्रामपंचायतीचे अभिनंदन केले.

स्पर्धेत द्वितीय पुरस्कार दर्यापूर तालुक्यातील सांगवा, तर तृतीय पुरस्कार अमरावती तालुक्यातील केकतपूर ग्रामपंचायतीला मिळाला आहे. तसेच तिवसा तालुक्यातील करजगावला स्व. वसंतराव नाईक विशेष पुरस्कार, अचलपूर तालुक्यातील देवगावला डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष पुरस्कार आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली चोरला स्व. आबासाहेब खेडकर विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रथम पुरस्काराची रक्कम 6 लाख, द्वितीय 4 लाख, तृतीय 3 लाख तर प्रत्येक विशेष पुरस्काराची रक्कम 50 हजार रुपये आहे.

घोडसगाव ग्रामपंचायतीने घनकचरा व्यवस्थापनासाठी गांडूळ खत प्रकल्प, सांडपाणी व्यवस्थापनासाठी बंदिस्त गटारे व शोषखड्डे, परसबागा, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, 100 टक्के शौचालय वापर, जनावरांच्या मलमूत्राचे व्यवस्थापन, टीसीएलचा वापर, अंगणवाडीत सॅनिटरी नॅपकीन व डिस्पोजल मशिन, तसेच श्रमदानाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढविला. या सर्व उपाययोजनांमुळे घोडसगावने स्वच्छ, सुंदर व आदर्श गावाकडे वाटचाल करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

# 'गण गण गणात बोते' भक्ती महानाट्याने स्नेहसंमेलनाचा प्रारंभ



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.30 )** - चांदूर बाजार येथील जगदंब पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन हे नेहमीच तालुक्यातील रसिकांसाठी सांस्कृतिक पर्वणी ठरते. यंदाच्या स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराज यांच्या जीवनावर आधारित 'गण गण गणात बोते' या भक्ती महानाट्याने साजरा होणार आहे. महाराजांच्या विजयग्रंथावर आधारित हे महानाट्य आध्यात्मिक भावनेने सादर करण्यात येणार असून, सुमारे शंभर कलाकारांचा सहभाग, नेत्रदीपक प्रकाशयोजना व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही याची वैशिष्ट्ये असतील. विजयग्रंथातील 21 अध्यायांमधील विविध चमत्कार—विहिरीला पाणी येणे, पलंग जळणे, चिलम पेटविणे आदी प्रसंग रंगमंचावर प्रभावीपणे साकारले जाणार आहेत. श्रीसंत गजानन महाराजांच्या प्रकटदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम भक्त व रसिकांसाठी अविस्मरणीय ठरेल, असा विश्वास आयोजक विनोद कोरडे यांनी व्यक्त केला आहे.


## जाहीरनामा

या ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक, हिंदुस्थान पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लिमिटेड, नागपूर क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांनी मौजा रामापुर जांभळा, ता. अचलपूर, जि. अमरावती येथील शेत भुमापन क्रमांक व उपविभाग 4/2/1. क्षेत्र 22.68 हे.आर चौ.मी. मध्ये किरकोळ विक्री करीता 'पेट्रोल पंप' सुरु करण्यासाठी नाहरकत दाखला मिळण्याकरीताचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

तरी, ज्या कोणत्या इसमास आपला हक्क अथवा हरकत घ्यावयाचे असेल त्यांनी लेखी तक्रार अर्ज दिनांक /2025 रोजी किंवा त्यापूर्वी या कार्यालयास सादर /करावेत. अन्यथा पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**उपविभागीय अधिकारी,**
**अचलपूर**


# प्रेरणादायी : हृदयशस्त्रक्रियेनंतर नवजीवन!

## पोलिस अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अंश चा प्रजासत्ताक दिनी गौरव



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )**- अंजनगाव सुर्जी तालुक्यातील काठीपूरा, आंबेडकर नगर येथील अंश सुधीर इंगळे (वय 10) सध्या मुंबईङ्कठाणे येथे वास्तव्यास आहे. गेल्या 3 जानेवारी रोजी त्याच्यावर हृदयाची अतिमहत्त्वाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. शस्त्रक्रियेनंतर अंशची प्रकृती स्थिर असून तो पूर्णपणे सुरक्षित आहे. कठीण प्रसंगावर मात करून पुन्हा नव्या उमेदीनं उभा राहिलेल्या अंशची कहाणी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शस्त्रक्रियेनंतर संवाद साधताना मोठे होऊन मला पोलिस अधिकारी व्हायचे आहे, असे स्वप्न अंशने व्यक्त केले. या स्वप्नाला बळ देण्यासाठी एका स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून नवी मुंबईतील वाशी पोलिस स्टेशन येथे 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनी अंशला प्रमुख पाहुणा म्हणून आमंत्रित करण्यात आले.

या वेळी अंशच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. हा क्षण उपस्थितांसाठी भावूक करणारा ठरला. विशेष बाब म्हणजे, वाशी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी अंशला स्वत:च्या खुर्चीवर बसवून त्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरल्याचा अनुभव दिला. चांदेकर यांनी अंशचे कौतुक करत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व तू नक्कीच एक उत्कृष्ट पोलिस अधिकारी होशील, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमास पोलिस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हृदयशस्त्रक्रियेसारख्या कठीण संकटावर मात करून स्वप्नांना नवी दिशा देणाऱ्या अंश इंगळेची ही प्रेरणादायी वाटचाल समाजासाठी आशेचा किरण ठरत आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक




# बालांगण

# घेऊ नका ताण

हेल्थ वेल्थ

खेळामुळे तुम्ही तंदुरूस्त राहता. तुम्ही क्रीडा स्पर्धांमध्येही सहभागी होत असाल. एखाद्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुम्ही खूप तयारी करता, सराव करता. पण स्पर्धेचा खूप ताणही असतो. थोडा ताण येणं अगदी स्वाभाविक आहे. पण स्पर्धेचा खूप ताण घेणं चुकीचं आहे. स्पर्धेचा ताण येऊ नये यासाठी काय करायला हवं याविषयी... खेळांमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा असतात. टेनिस, बॅडमिंटनसारख्या खेळांमध्ये तुम्ही एकटे असता तर क्रिकेट, हॉकीमध्ये संघातले एक सदस्य असता. स्पर्धेत सहभागी होण्याआधी तुमच्या पोटात फुलपाखरं उडतात का? तुम्हाला कसं तरी वाटतं का? स्पर्धेच्या आधी अनेकांना असं होऊ शकतं. आपल्याकडून कोणतीही चूक होऊ नये, ही यामागची भावना असते. अर्थात बड्या खेळाडूंनाही क्रीडा स्पर्धांचा ताण येतो. थोडा ताण येणं ठिक आहे. यामुळे तुमचं शरीर आणि मन स्पर्धेसाठी तयार होतं. आपल्या शरीरात विशिष्ट प्रकारचे हार्मोन तयार होतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. पण खूप ताण आला असेल तर यामागची कारणं शोधणं गरजेचं आहे. स्पर्धे आधी भरपूर झोप घ्या. ताणामुळे झोप येत नाही. पण याचा त्रास पुढे होतो. यामुळे स्पर्धेत लक्ष केंद्रित करणं कठिण होऊन बसतं. स्पर्धेच्या दिवशी पोषक आहार घ्या. स्पर्धेआधीच्या सगळ्या सराव सत्रांना हजर राहा. संघातल्या सहकाऱ्यांशी बोला. प्रशिक्षकांची मदत घ्या. स्पर्धेआधी थोडा आराम करा. गाणी ऐका. आवडते चित्रपट बघा. यामुळे ताण कमी होईल. छानसं पुस्तकही वाचता येईल. खेळ म्हटला की जय आणि पराजय ठरलेले असतात. अपयशातून धडे घ्या. आधीच्या चुका पुन्हा करू नका. पुढच्या वेळी अधिक जोमाने सराव करा पण स्पर्धेचा ताण अजिबात घेऊ नका.






# इथे नाहीत रस्ते!

फन टाईम

तुमच्या शहरात रस्ते नसतील तर? मग प्रवास कसा करायचा, हा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. पण जगातल्या बऱ्याच शहरांमध्ये रस्ते नाहीत बरं का! इटलीमधील व्हेनिस शहरात रस्ते नाहीत. इथले लोक बोटीने प्रवास करतात. नेदरलँडमध्येही असं एक शहर आहे. या शहरात चीनमधले पर्यटक मोठ्या संख्येने येतात.

गीथोर्न हे नेदरलँडमधलं सर्वात सुंदर शहर मानलं जातं. याला फेअरी टेल व्हिलेज असंही म्हणतात. लिटल व्हेनिस या नावानेही हे शहर ओळखलं जातं. या शहरात दर वर्षी दीड ते दोन लाख चिनी पर्यटक येतात. डच चित्रपटनिर्माते बर्ट हन्सतरा यांनी आपल्या चित्रपटात या शहराचं दर्शन घडवलं होतं. या शहरातले पोलीसही बोटीतूनच प्रवास करतात. या शहराची लोकसंख्या आहे अवघी २६००. इथल्या लोकांकडे प्रवासासाठी गाडी, बाईक असं काहीही नाही. हे संपूर्ण शहर एका तलावाच्या किनारी वसलं आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी इथे पूल बांधण्यात आले आहेत. या शहरात लाकडी पुलांची संख्या १८० आहे. इथे बोटीतूनच प्रवास करावा लागतो. दुसरा कोणताही मार्ग इथल्या रहिवाशांकडे नाही. दररोजच्या खरेदीसाठीही बोटीतूनच जावं लागतं. इथले पोस्टमनही बोटीतूनच प्रवास करतात. या शहरात फिरायचं असेल तर तुमच्याकडे ७५ युरो असले पाहिजेत. एवढे पैसे दिले की तुम्ही ७.३० तास अगदी निवांत फिरू शकता. अशा ठिकाणी जायला आणि बोटीतून फिरायला काय मजा येईल नाही?



# वायफायशिवाय करा डाटा ट्रान्सफर

स्मार्ट टेक

पर्यावरणाला धोका न पोहोचवता आता डाटा ट्रान्सफर करणं शक्य होणार आहे. डाटा ट्रान्सफर करण्यासाठी वायफाय तंत्रज्ञानाची मदतही घ्यावी लागणार नाही. एलईडी लाईट्सच्या मदतीने डाटा ट्रान्सफर करणं लवकरच शक्य होणार आहे. ब्रिटनमधल्या एडनबर्ग विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. एलईडी दिवे प्रकाश देण्यासोबतच डाटा ट्रान्सफर करू शकतील, अशा प्रकारचं हे तंत्रज्ञान आहे. या पद्धतीत प्रकाशात कोणताही बदल होणार नाही तसंच विजेचा वापरही मर्यादित प्रमाणात असेल.

याआधी डाटा ट्रान्सफर करण्यासाठी लायफाय तंत्रज्ञानाचा वापर केला जात असे. यात ऊर्जेचा अधिक वापर होण्यासोबतच प्रकाशाचे रंग आणि तीव्रतेवरही परिणाम होत असे पण नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने ही कमतरता दूर करता येणं शक्य होणार आहे. या संशोधनामुळे वायरलेस ट्रान्सफर सिस्टिम विकसित करणं शक्य होणार आहे. एलईडी तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल, टॅबलेट किंवा इतर यंत्रांमधला डाटा ट्रान्सफर करता येतो, याची माहिती शास्त्रज्ञांना होती. पण या प्रक्रियेत एलईडीच्या वैशिष्ट्यांवर दुष्परिणाम होऊ नये, यासाठी प्रयत्न सुरू होते. डाटा ट्रान्सफर करण्यासाठी एलईडी मोर्स कोडप्रमाणे काम करेल. मोर्स कोड ही रेडियो लहरींची एक भाषा आहे. या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अनेक लाभ होणार आहेत. यामुळे एलईडी दिव्यांचा वापर वायफायसारखा करणं शक्य होणार आहे.

# करीअर फिल्म मेकिंगमधलं...

कोण होणार?


तुम्हाला चित्रपट बघायला आवडतो. चांगली कथानकं असलेले चित्रपट भरपूर कमाई करतात. चित्रपट हा समाजाचा आरसा असतो असं म्हणतात. चित्रपटाच्या माध्यमातून तुम्ही आपल्या कल्पनांना मूर्त रूप देऊ शकता. आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणू शकता. तुम्हालाही चित्रपट हे माध्यम आवडत असेल तर फिल्म मेकिंगमध्ये करीअर करता येईल. चित्रपटाची निर्मिती करण्यासाठी तुमच्याकडे कॅमेरा हवा, चांगलं कथानक हवं, कलाकार हवेत. चित्रपटाची विशिष्ट भाषा हवी. चित्रपटात दृश्य असतात, आवाज असतो, गाणी-संगीत असतं. चित्रपटनिर्मितीसाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. चित्रपटांचा हा प्रवास खूप अनोखा आहे. आजच्या काळात थ्रीडी, डिजिटल माध्यमांद्वारे चित्रपटनिर्मिती केली जाते. या क्षेत्रात बारावीनंतर करीअर करता येईल. फिल्म मेकिंगच्या क्षेत्रात पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही पदवी अभ्यासक्रमही आहेत. बारावीनंतर तुम्ही पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकता तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी किमान ४० टक्के गुणांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणं गरजेचं असतं. पटकथा, दिग्दर्शन, सिनेमाटोग्राफी, संगीत, कोरियोग्राफी, व्हिडिओ एडिटिंग, बॅकग्राउंड साउंड, वितरण आणि प्रमोशन, चित्रपट समिक्षा अशा विविध विभागांमधले तज्ज्ञ म्हणून तुम्ही काम करू शकता. पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन सिनेमा, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डायरेक्शन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन सिनेमाटोग्राफी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन साउंड रेकॉर्डिंग अँड साउंड डिझाइन असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.



# फीचर्स गुगल क्रोमचे...

स्मार्ट फन

स्मार्टफोन असो किंवा कॉम्प्युटर, सर्फींग करण्यासाठी तुम्ही कोणत्या ना कोणत्या ब्राउजरचा वापर करतच असाल. बरेच लोक गुगल क्रोमच्या माध्यमातून सर्फिंग करतात. क्रोम हे जगातलं सर्वात लोकप्रिय असं सर्च इंजिन आहे. गुगल क्रोममध्ये अनेक फीचर्स आहेत. या फीचर्सचा वापर करून तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे नेट सर्फिंग करू शकता. गुगलच्या या तीन फीचर्सविषयी जाणून घ्या.




* अनेकदा आपण इतरांच्या कॉम्प्युटर किंवा स्मार्टफोनवर नेट सर्फिंग करतो. तसंच गुगल आपली माहिती जाणून घेत असतं. यावरून आपल्या कॉम्प्युटर स्क्रीनवर जाहिरातींचा मारा होत असतो. आपण काय सर्च केलं आहे हे कोणाला कळू नये असं वाटत असेल तर इनकॉग्निटो मोडची निवड करता येईल. यामुळे तुमची सर्च हिस्ट्री गुप्त राहते. ब्राउजरच्या मेनूमध्ये तुम्हाला हे फीचर मिळेल.

* इनकॉग्निटो मोडबद्दल अनेकांना माहीत असतं पण डायरेक्ट सर्च या ऑप्शनची माहिती फार कमीजणांना असते. गुगलवर दुसरं पेज ओपन केलं असेल तरी तुम्ही एखादा शब्द सर्च करू शकता. यासाठी तुम्हाला दुसरा टॅब ओपन करायची गरज भासणार नाही. शोधायच्या असलेल्या शब्दावर तुम्ही होल्ड करा. यामुळे गुगल लोगोसह तो शब्द दिसू लागेल. गुगल लोगोवर टॅप केल्यावर त्याच पेजवर राहून तुम्ही सर्च करू शकाल.

* गुगल क्रोमवर सर्च करताना तुम्ही डाटा सेव्ह करू शकता. स्मार्टफोनवर गुगल क्रोमचा वापर करणाऱ्यांना हे फीचर उपयुक्त ठरू शकतं. गुगल क्रोमच्या सेटिंग्जमध्ये गेल्यावर खालच्या बाजूला सेव्ह डाटा हा ऑप्शन दिसेल. हा ऑप्शन ऑन करा. यामुळे ब्राउसिंगही झटपट करता येईल.

# थर्मामीटर बनवा घरच्या घरी

करून तर पाहा

आपल्याला ताप आला की नेमकं प्रमाण मोजण्यासाठी थर्मामीटरचा वापर केला जातो. थर्मामीटर बाहेरून आणलं जातं. तुम्ही घरच्या घरीही ते तयार करू शकता.

**साहित्य :** चिकण माती, खायचा लाल रंग, पाणी, स्ट्रॉ, रबिंग अल्कोहोल, प्लास्टिकची छोटी बाटली, थर्मामीटर (पर्यायी)

**कृती:** पाणी आणि अल्कोहोल सम प्रमाणात घेऊन पाव बाटली भरून घ्या. यात लाल रंग घाला.



हलवून घ्या. आता या बाटलीत स्ट्रॉ ठेवा. बाटलीच्या तोंडाजवळ तसंच स्ट्रॉच्या वरच्या बाजूला चिकण माती लावा. यामुळे स्ट्रॉ हलणार नाही. स्ट्रॉ बाटलीबाहेर येऊ द्या. चिकण मातीने बाटलीचं तोंड बंद करा. स्ट्रॉसुद्धा नीट बसायला हवा पण स्ट्रॉचं वरचं तोंड उघडं ठेवा. आता प्रयोग करा. बाटलीला बाहेरून हात लावा. बाटलीला गरम हात लागल्यावर काय होतं, हे बघा. यात नेमकं होतं काय तर अल्कोहोल आणि पाण्याचं मिश्रण गरम झालं की उसळतं आणि पाणी स्ट्रॉच्या वरच्या बाजूला येतं. ते स्ट्रॉच्या अगदी वरपर्यंत येण्यासाठी पाण्याला किती उष्णता मिळायला हवी, हे तुम्हीच ठरवा. पाणी पोहोचलेल्या भागावर छोटी खूण करा. आता दुकानातून आणलेल्या थर्मामीटरच्या मदतीने स्ट्रॉमधल्या पाण्याचं तापमान मोजा. घरातल्या थंड आणि गरम भागात जाऊन तुम्ही हा प्रयोग करू शकता.



# स्वप्ने का आणि कशी पडतात ?

रंजक विज्ञान

आपण शांतपणे झोपलेलो असतो. डोळे बंद असतात. शरीर हालचाल करत नसते. तरीही आपल्या मनात चित्रे दिसतात. आवाज ऐकू येतात. कधी आपण उडतो. कधी पळतो. कधी घाबरून जागे होतो. जागे झाल्यावर लक्षात येते, की हे तर स्वप्न होते.

आपण झोपलो की आपले शरीर विश्रांती घेते. पण मेंदू पूर्णपणे झोपत नाही. मेंदूचा एक भाग सतत काम करत असतो. दिवसभर आपण जे पाहतो, ऐकतो, शिकतो, अनुभवतो ते सगळे मेंदूत साठवून ठेवले जाते. झोपेत मेंदू ही सगळी माहिती नीट लावण्याचे काम करतो. खोली आवरताना आपण खेळणी एकत्र ठेवतो, पुस्तके एका कप्प्यात ठेवतो, तसेच मेंदू आठवणी नीट रचून ठेवतो. या आठवणी रचताना कधी कधी वेगवेगळ्या गोष्टी एकमेकांमध्ये मिसळतात आणि त्यातून स्वप्ने तयार होतात. म्हणूनच ही स्वप्ने कधी खूप मजेशीर, कधी विचित्र, तर कधी थोडी भीतीदायक असतात. उदाहरणार्थ, शाळेत झालेली परीक्षा, पाहिलेला चित्रपट, आई-बाबांनी सांगितलेली गोष्ट किंवा एखादी भीती हे सगळे स्वप्नात एकत्र येऊ शकते.



स्वप्न पडताना शरीर हालचाल करत नाही. कारण निसर्गाने तशी खास व्यवस्था केलेली आहे. नाहीतर आपण स्वप्नात धावलो, तर खरेच धावायला लागलो असतो ना! त्यामुळे शरीर शांत राहाते आणि फक्त मन तेवढे स्वप्नात फिरत असते.


काही स्वप्ने आनंदी असतात. तर काही वाईट आणि दु:खी असतात. वाईट स्वप्न पडणेही चुकीचे नाही. आपला मेंदू अशा स्वप्नांच्या मार्गाने भीती, ताण किंवा काळजी कमी करण्याचा प्रयत्न करत असतो. म्हणूनच लहान मुलांना अंधाराची, एकटेपणाची किंवा मोठ्या आवाजाची स्वप्ने जास्त पडतात.स्वप्न म्हणजे मेंदूची भाषा आहे. ती आपल्याला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत असते. म्हणून स्वप्न म्हणजे आजार किंवा जादू नाही. ते आपल्या हुशार मेंदूचे काम आहे. झोप नीट झाली,मन शांत ठेवले तर

# शिवालिक पर्वतरांगा

पर्वतरांगा

शिवालिक पर्वतरांग हा हिमालय पर्वतरांगेचा सर्वात बाहेरील आणि कमी उंचीचा भाग आहे. शिवालिक म्हणजे डोंगरांच्या पायथ्याशी असलेली रांग. ही पर्वतरांग जम्मू-काश्मीरपासून सुरू होऊन हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि आसाम पर्यंत पसरलेली आहे. ही पर्वतरांग माती, वाळू, गोटे आणि दगडांच्या थरांनी तयार झालेली आहे. त्यामुळे ती इतर हिमालयीन भागांच्या तुलनेत नाजूक आहे. त्यामुळेच येथे भूस्खलन होण्याची शक्यता अधिक असते. या भागातील शिखरांची उंची साधारण ६०० ते १५०० मीटरच्या दरम्यान आहे. चंद्रभागा टेकडी, नाहन परिसरातील टेकड्या आणि आसामकडील पठारी भाग तुलनेने उंच आहेत.


शिवालिक पर्वतरांगेत काही ठिकाणी चुना दगड, क्वार्ट्झ, फेल्स्पार यासारखी खनिजे सापडतात. ही खनिजे काच उद्योग, सिरॅमिक आणि बांधकामासाठी वापरली जातात. या पर्वतरांगेतून घग्गर, मारकंडा, टॉन्स, कोसी यासारख्या अनेक लहान नद्या आणि ओढे उगम पावतात. त्यांना स्थानिक भाषेत चोअ किंवा खड असे म्हणतात. पावसाळ्यात या नद्या प्रचंड वेगाने वाहतात. तर उन्हाळ्यात अनेकदा कोरड्या पडतात. या नद्यांमुळे आसपासच्या शेतीला पाणी मिळते. येथील दाट जंगलांमध्ये साल, खैर, शिसव, साग, बांबू, गवताची जंगले मोठ्या प्रमाणात आहेत. ही जंगले मातीची धूप रोखण्यास मदत करतात. या भागात गुजर, थारू आणि काही ठिकाणी गोंडसदृश आदिवासी समुदाय राहतात. हे लोक पशुपालन, शेती आणि जंगलावर आधारित जीवन जगतात. या पर्वतरांगेतील जंगलांमध्ये हत्ती, वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण, सांबर, नीलगाय, रानडुक्कर असे अनेक प्राणी तसेच मोर, तीतर, ससाणा, गरुड, घुबड, रानकोंबडा यांसारखे पक्षी आढळतात. शिवालिक पर्वतरांग भूगर्भशास्त्रीय दृष्ट्या नवीन व नाजूक असल्यामुळे येथे खाणकाम करणे धोकादायक मानले जाते. येथे चालू असलेल्या अति खाणकामामुळे भूस्खलन, जंगल नाश आणि पाण्याच्या स्रोतांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे इथल्या खनिज संपत्तीचा वापर करताना पर्यावरणाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे.



# वैशिष्ट्यपूर्ण अभ्रक

माहिती खनिजांची

अभ्रक हे एक चमकदार पारदर्शक आणि पातळ पापुद्रे असलेले खडकात सापडणारे खनिज आहे. अभ्रकाचे सर्वाधिक उत्पादन भारतात होते. अभ्रकाच्या खाणी प्रामुख्याने झारखंड आणि बिहारमध्ये आहेत. [illegible] आहेत. याशिवाय मध्य प्रदेश आणि ओडिशामध्येही काही प्रमाणात अभ्रक आढळतो. अभ्रकाचे वैशिष्ट्य म्हणजे ते उष्णता सहन करू शकते. त्यातून वीज प्रवाहित होत नाही. अभ्रक सहजपणे तुटत नाही. अभ्रक प्रामुख्याने आग्नेय आणि रूपांतरित खडकांमध्ये आढळते. काही ठिकाणी जमिनीवरच अभ्रकाचे थर दिसतात. तर काही ठिकाणी खाणीत खोलवर जावे लागते. खाणीतून मोठे खडक काढले जातात आणि त्यामधून अभ्रक वेगळे केले [illegible] काही अभ्रक बारीक पूड स्वरूपातही तयार केला जातो. अभ्रकाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील मस्कोवाइट आणि बायोटाइट हे प्रकार जास्त प्रसिद्ध आहेत. मस्कोवाइट रंगाने फिकट किंवा पारदर्शक असतो. बायोटाइट गडद रंगाचा असतो. वीज उपकरणांमध्ये अभ्रकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. हीटर, इस्त्री, इलेक्ट्रिक मोटर, ट्रान्सफॉर्मर यामध्ये अभ्रक वापरला जातो. बांधकाम क्षेत्रात अभ्रकाचा उपयोग उष्णता व आवाज रोखण्यासाठी केला जातो. रंग, सौंदर्य प्रसाधने, औषधे, रबर, प्लास्टिक आणि कागद उद्योगात अभ्रकाची पूड वापरली जाते.पूर्वी स्वयंपाकाच्या चुली, दिवे आणि खिडक्यांमध्येही अभ्रकाचा वापर होत असे. आज पर्यावरण आणि आरोग्याच्या दृष्टीने त्याच्या वापरावर काही मर्यादा घालण्यात आल्या आहेत.



# महापौरपदासाठी सव्वा सव्वा वर्षाचा फार्म्युला?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
विभागीय आयुक्तांकडून महापौरपदाच्या निवडणुकीसाठी ६ फेब्रुवारी हा दिवस निश्चित करण्यात आला. परंतु भाजपचा महापौरपदाचा पेच अद्यापही कायम आहे. महापौरपद खुला महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. यासाठी अनेकांची नावे शर्यतीत आहे.

मात्र आरक्षण मर्यादा ओलांडल्याने ओबीसी नगरसेवकांवर संकट कायम आहे. पुढील काळात त्यांचे सदस्यत्व रद्द होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वप्रथम महापौरपदासाठी ओबीसी नगरसेविकेला संधी द्यायची की खुल्या प्रवर्गालाच प्राधान्य द्यायचे, यात भाजप अडकली असल्याचे समजते.

सव्वा वर्ष ओबीसी व सव्वा वर्ष खुला प्रवर्ग या सूत्रावरही विचार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपने मागील सत्ताकाळात हेच सुत्र वापरत आमदार संदीप जोशी व शहर भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांना महापौरपद दिले होते.

दरम्यान, महापौरपदाच्या निवडणुकीसाठी २ फेब्रुवारीला नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार आहे. त्यामुळे याच दिवशी महापौरपदाच्या नावावरून पडदा उठणार आहे.

महापालिका निवडणूक होऊन आता पंधरा दिवसांचा कालावधी लोटला. मात्र, स्पष्ट बहुमत असूनही भाजपला ना महापौरपदाचा उमेदवार निश्चित करता आला, ना गट नोंदणीही करता आली. त्यामुळे वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहे.

भाजपच्या संसदीय समितीची बैठक बुधवारी होणार होती. यात महापौरपदासह उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्षावर चर्चा करण्याचे नियोजित होते. परंतु राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी सकाळी अपघाती निधन झाल्याने ही बैठक रद्द करण्यात आली. गुरुवारी ही बैठक झाली नसल्याचे भाजपमधील ज्येष्ठ नगरसेवकाने नमूद केले.

शुक्रवारी ही बैठक होण्याबाबतही काहीही संकेत नसल्याची पुस्तीही नगरसेवकांनी जोडली. दरम्यान, संसदीय समितीतील नेत्यांनी नगरसेवकांच्या घरोघरी भेट देऊन गट नोंदणीसाठी त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचा कार्यक्रम पार पडला.

> महापालिकेच्या सचिवालयाने येत्या ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजतापासून महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सदस्यांच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. महापौरपदासाठी निवडणूक ६ फेब्रवारीला घेण्यात येणार असल्याने २ फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येणार आहे. ६ फेब्रुवारीला सभा सुरू होताच उमेदवारी अर्जाची छाननी, त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येणार आहे. नंतर उमेदवारांच्या नावाची घोषणा व मतदान घेतले जाणार आहे. शेवटी निकालाची घोषणा करण्यात येईल. हीच पद्धत उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी वापरली जाईल. त्यानंतर महापौर व सत्तापक्ष नेते व विरोधी पक्षनेत्यांनी स्थायी समिती सदस्यत्वासाठी दिलेल्या नगरसेवकांची नावाला सभागृहाची मान्यता देण्यात येणार आहे.

याचदरम्यान नगरसेवक तसेच ज्येष्ठ नेत्यांनी महापौरपदाचा उमेदवाराबाबतही चर्चा केल्याचे सूत्राने नमूद केले. महापौरपद खुल्या प्रवगार्तील नगरसेविकेसाठी राखीव आहे. परंतु आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने ओबीसी नगरसेवकांचे सदस्यत्व धोक्यात येण्याची शक्यता बघता याच प्रवर्गाला महापौरपद द्यायचे की खुल्या प्रवर्गाला, अशा विचारात नेते अडकले आहेत.

त्यामुळे यावर तोडगा म्हणून सव्वा सव्वा वर्षाचे ओबीसी व खुल्या प्रवर्गाला महापौरपदाचे सूत्र वापरले जाऊ शकते, अशी शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

यापूर्वी मागील सत्ताकाळात सव्वा-सव्वा वर्षांच्या महापौरपदाचे सूत्र भाजपने वापरले आहे. मागील सत्ताकाळतील उर्वरित अडीच वर्षातील सव्वा वर्ष संदीप जोशी यांना तर त्यानंतरचे सव्वा वर्ष दयाशंकर तिवारी यांना महापौर करण्यात आले होते.

भाजपचे हे सूत्र यशस्वीही ठरले होते. त्यामुळे याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा भाजपच्या गोटात रंगली आहे.

# 'बारामती पॅटर्न'च्या वहिनी ही हकदार!

## राज्याच्या सुसंस्कृत वहिनीची दमदार कामगिरी..!

## दादा होते वहिनींच्या जीवावर राज्याच्या गळ्यातले ताईत

■ **संदीप काळे**

------------------------

आपल्यात नसणारे अजितदादा पवार राज्यातील प्रत्येक माणसाच्या गळ्यातील ताईत होते, त्याचे कारण सुनेत्रा पवार यांनी सांभाळलेला अवघाची संसार हेच आहे.



सुनेत्रा पवार यांनी दादांचे केवळ कुटुंबच सांभाळले नाही, तर सर्व नातेवाईक, मतदारसंघ, सामाजिक कामे, उत्सव आणि उपक्रमही समर्थपणे सांभाळले. बारामतीमध्ये होणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे होती. पवार कुटुंबाच्या मोठ्या घराण्यामध्ये डोक्यावरचा पदर सांभाळत वहिनी कधीही प्रसिद्धीच्या झोतात आल्या नाहीत. त्यांनी शांतपणे आपले चिरंतर टिकणारे काम कायम सुरू ठेवले. राज्याच्या सुसंस्कृत वहिनीची ही दमदार कामगिरी राज्यातील अनेकांना अद्याप माहितीच नाही.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर गेल्या दोन दशकांपासून आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या खा. सुनेत्रावहिनी पवार यांनी 'कर्तृत्ववान महिला नेतृत्व' म्हणून स्वतःची ओळख सिद्ध केली आहे. राज्यसभा खासदार म्हणून दिल्लीत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करण्यासोबतच त्यांनी ग्रामीण विकासाचा नवा संकल्प सोडला आहे. केवळ एका प्रतिष्ठित घराण्याची सून एवढीच ओळख न ठेवता त्यांनी समाजकारण, पर्यावरण आणि सक्षमीकरणाचा एक आदर्श 'बारामती पॅटर्न' उभा केला आहे.

राज्यसभा खासदार म्हणून सुनेत्रा पवार यांनी संसदेत महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रश्न प्रभावीपणे मांडले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे बारामती-लोणंद आणि बारामती-फलटण या रेल्वे मार्गांच्या कामाला गती मिळाली असून, 'अमृत भारत स्टेशन' योजनेअंतर्गत नीरा रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

संसदेत त्यांनी खतांचा तुटवडा, हमीभाव आणि शेतकऱ्यांचे अनुदान यावर आग्रही भूमिका घेतली. तसेच पुण्यात नवीन 'एम्स' रुग्णालय आणि ग्रामीण तरुणांसाठी 'कौशल्य विकास केंद्र' उभारण्यासाठी त्या सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

त्यांच्या 'एन्व्हायर्नमेंटल फोरम ऑफ इंडिया'च्या माध्यमातून आता 'प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र' ही मोहीम मोठे रूप धारण करीत आहे. ग्रामीण भागात 'शाश्वत शेती' आणि सेंद्रिय उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी त्या नवीन व्यासपीठ तयार करून दिले आहे.

महिला सक्षमीकरणाचा पुढचा टप्पा म्हणून 'महिला स्टार्टअप हब' उभारण्याचे त्यांचे नियोजन आहे. बारामतीतील कान्हेरी वन उद्यानाचा विकास करून 'इको-टुरिझम'ला चालना देणे आणि 'विद्या प्रतिष्ठान'च्या माध्यमातून 'ग्रीन एज्युकेशन' राबवणे, हे त्यांनी साकार केले आहे.

सुनेत्रा पवार यांनी दिल्लीतील संसदीय कार्य आणि राज्यातील समाजकारण यांचा अत्यंत सुवर्णमध्य साधला आहे. काटेवाडीला 'इको-व्हिलेज' बनवण्यापासून ते हायटेक टेक्स्टाईल पार्कच्या माध्यमातून हजारो महिलांना रोजगार मिळवून देण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचा कणा ठरत आहे.

बारामतीमध्ये दादांनी जेजे उपक्रम हाती घेतले ते मार्गी लावायचे काम सुनेत्रा पवार यांनी केले आहे. बारामती मधील आरोग्य सेविका सविता जाधव सांगत होत्या , दादा आमचे दैवत होते तर वाहिनी आमच्या आई आहेत. बारामती मध्ये वाहिनीने पाठपुरावा केला म्हणून आमच्या आरोग्य विभागाचे तेरा विषय मार्गी लागले याचा इतिहास झाला आहे.

ह्या आरोग्याचा पायंडा पुढे राज्यात पडला. विकास गजभारे म्हणाले, आम्ही ग्रंथालय प्रश्नांच्या अनुषंगाने राज्यभर आंदोलन करणार होतो पण ते प्रश्न सुनेत्रा पवार यांनी पुढाकार घेऊन सोडवले.

खा. सुनेत्रा पवार यांच्यावर जबाबदारी दिली तर त्यांना पेलणार की नाही अशी चिंता अनेकांच्या मनात आहे त्याचे कारण त्यांनी डोक्यावरचा पदर न पडू देता उभे केलेले काम सर्व दूर गेले नाही याची चर्चा आज जाणकार करीत आहेत.

--------------------

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे मुख्य समूह संपादक आहेत.)

## धुडगूस घालणाऱ्या युवतीसह १० कुख्यात गुंड अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. ३० :**
कुख्यात कुंदन परदेशी टोळीने शहरात धुडगूस घालत पोलिसांना आव्हान दिले. टोळीतील सदस्यावर रेकॉर्डवरील गुन्हेगाराने काही दिवसांपूर्वी हल्ला केला होता. त्या रागातून टोळीने हे कृत्य केले.

सुरुवातीला म्हसरुळमध्ये पिकअप लुटून अंबड गाठले. वाहनांची तोडफोड करून दहशत पसरवली. गंगापूररोडवर चहाविक्रेत्यावर हल्ला करत दुकानाची तोडफोड केली.

रात्रभर हा धुडगूस सुरू असल्याने नागरिक वेठीस होते. अखेर पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे टोळी गजाआड करत म्हसरुळ, गंगापूर, अंबडला ३ वेगवेगळे गुन्हे दाखल केले. टोळीच्या सर्व १० सदस्यांना पहाटे अटक करण्यात आली आहे.

# दगडाने ठेचून अनोळखी इसमाची निर्घृण हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**
दारू पिण्यासाठी पाण्याची बाटली दिली नसल्याने संतप्त आरोपींनी एका अनोळखी इसमाची दगड आणि सिमेंटच्या गट्टूने ठेचून हत्या केली . तहसील पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. संतराम सहेदलाल यादव (३२) परासिया रोड, जि. छिंदवाडा आणि रघुनाथ सोनवाणे (३५) चांगुटोला, जि. बालाघाट अशी आरोपींची नावे आहेत.

मृतक आणि मारेकरी हे मध्य प्रदेशातील राहणारे असून मोलमजुरीसाठी नागपूरला आले होते. २० जानेवारीच्या रात्री सर्वांनी नागपूर रेल्वेस्थानकाजवळील देशी दारूच्या भट्टीत दारू ढोसली. मृतकाने पाण्याची बाटली खरेदी केली होती. आरोपींनी त्याला पाणी मागितले असता मृतकाने पाणी दिले नाही. त्यामुळे त्यांच्यात वाद झाला.

त्यानंतर सर्वजण हे रामझुल्यावरून लोखंडी शिडीने खाली उतरले. स्टार गॅरेजजवळ येताच पुन्हा त्यांच्यात वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, आरोपींनी सिमेंटच्या गट्टूने मृतकाच्या तोंडावर, डोक्यावर मारहाण केली. सोबत्याला रक्तबंबाळ अवस्थेत सोडून आरोपी पळून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी रक्ताच्या थारोळ्यात मृतक मिळून आला. याप्रकरणी उमरखान मुबारक अली खान (३६) कब्रस्तान रोड, मोमीनपुरा याच्या तक्रारीवरून तहसील पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी मृतकाची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांना यश आले नाही. मृतकाच्या उजव्या मानेवर रमेश नाव गोंदले होते. त्याच्या खिशात ईतवारी स्थानकाचे प्लॅटफॉर्म तिकीट मिळून आले होते. पोलिसांनी ईतवारी रेल्वेस्थानकापर्यंतचे सुमारे दीडशे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात एका ठिकाणी मृतक आणि आरोपी दिसून आले. त्यानुसार पोलिसांनी ईतवारी स्थानकावर आपले लक्ष केंद्रीत केले. त्यासाठी पोलिसांची चार पथके तैनात करण्यात आली होती.

ईतवारी स्थानकावर तैनात पोलिसांना संतराम दिसून येताच त्याला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याने रघुनाथ आणि आरोपी अनिल वाघाटे यांच्यासह मृतकाच्या खुनाची कबुली दिली. पोलिसांनी संतराम आणि रघुनाथ यांना अटक केली. न्यायालयाने आरोपींना २ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तहसील पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## ३ फेब्रुवारीला स्पष्ट होणार महापौरपदाचा चेहरा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. ३० :**
महापौरपदासाठी ६ फेब्रुवारीला निवडणूक होणार असली तरी या पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडेल, याचे चित्र ३ फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर स्पष्ट होईल.

दुपारी २ पर्यंत अर्जासाठी अंतिम मुदत आहे. भाजपकडे स्पष्ट बहुमत असून पक्षाच्या १६ महिला नगरसेविका पात्र आहेत. मात्र, यात प्रामुख्याने तीन नावांची सर्वाधिक चर्चा आहे. वरिष्ठ पक्षनेत्यांची पसंती तीनपैकी कोणाला, याविषयीच आता उत्सुकता वाढली आहे. भाजपकडे स्पष्ट बहुमत असले तरी महापौरपदासाठी महिलांमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# भारताला जागतिक व्यापाराची खुली संधी

तब्बल दीड दशकाहून सुरु असलेल्या वाटाघाटींना यश येऊन भारत आणि युरोपीय व्यापार संघामध्ये कालच ऐतिहासिक व्यापार करार संपन्न झालेला आहे. हा करार भारताने आजवर केलेल्या द्विपक्षीय व्यापार करारामध्ये करार मानला जात आहे. या करारामुळे इयू मध्ये भारताच्या ९९ टक्के वस्तूवरील करभार कमी होणार असून इयू च्या ९७ टक्के वस्तुंना भारतात मुक्तदार खुले होणार आहे. याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ शशांक गुळगुळे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**भारत आणि युरोपीय महासंघात संपन्न झालेल्या या ऐतिहासिक कराराचे महत्व काय?**

■ दोन्ही देशांतील या करारामुळे युरोपीय निर्यातदारांच्या वार्षिक शुल्कात ४ अब्ज युरोची कपात होणार आहे. या ऐतिहासिक करारामुळे सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भारत आणि युरोप मधील लाखो लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत आणि इयू मधील वस्तूंचा एकूण व्यापार सुमारे १३६ अब्ज डॉलर इतका होता त्यात आता वाढ होईल. दोन्ही बाजूनी प्रथमच सुरक्षा आणि संरक्षण भागीदारी केली आहे.

**या कराराचा प्रत्यक्ष लाभ कोण कोणत्या क्षेत्रांना होणार आहे?**

■ या ऐतिहासिक कराराचा सर्वात मोठा लाभ हा भारतीय कृषी क्षेत्राला होणार आहे. प्रक्रिया केलेले अन्न, चहा, कोफी, मांस, मसाले या उत्पादनासाठी आता इयूचे मुक्त द्वार खुले झाले आहे. कपडे, चामड्याच्या वस्तू, पादत्राणे, दागिनेआणि खेळण्यावरील शुल्क रद्द होणार आहे. डिझेल, इलेक्ट्रॉनिक्स, ईटीएफ, टेक्स्टाईल, कम्प्युटर, पोलाद आणि लोखंड उद्योगाला चालना मिळणार आहे.

सध्या ४ ते २६ टक्क्यापर्यंत शुल्कआकारानी होणारी ३३ अब्ज डॉलर्सची निर्यात शुल्कमुक्त होणार आहे. इयूतील तंत्राधारेत उत्पादने स्वस्त होऊन भारतीय ग्राहकांना लाभ होईल. वाईन, बिअर आणि मद्यावरही कर कपात होणार आहे.

**या कराराचा भारतीय उद्योगांना प्रत्यक्ष फायदा कसा होणार आहे?**

■ या करारान्वये भारतातील ९९ टक्क्याहून अधिक निर्यातीला इयू बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळणार आहे. एमएसएमी क्षेत्राला उद्योगाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, सागरी उत्पादने, रत्ने आणि दागिने यासारख्या श्रमप्रधान क्षेत्रातील ३३ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीला एफटीए अंतर्गत थेट प्रवेश मिळणार आहे.

वाहन उद्योगासाठी कोटा आधारित काळजीपूर्वक आखलेले धोरण असणार आहे.मेक इन इंडिया अंतरंगात भारतातून उद्योग आणि रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत. कुशल आणि अकुशल कामगारांना जागतिक स्तरावर संधी मिळणार आहेत.

■ ■ ■

लोकरंग



# वाकी वुड्स

नागपूर हे मोठ्या संख्येने पर्यटन स्थळांचे घर आहे, त्यातील प्रत्येक तुम्हाला एक अनोखा अनुभव आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थ देण्यासाठी उभे आहे. वाकी वुड्स हे एक चित्तथरारक नैसर्गिक आकर्षण आहे जे नागपुरातून जवळपास ३० किलोमीटरचा प्रवास करून इतर दिशेने पोहोचता येते.

पिकनिकला घालवलेल्या एका दिवसासाठी एक आकर्षक नैसर्गिक सेटिंग देण्याव्यतिरिक्त, हिरव्यागार हिरव्या भाज्या तुम्हाला मजा आणि मनोरंजनासाठी विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून देतात. तुम्हाला हे लक्षात येईल की या जंगलात राहणे हे आधुनिकता आणि वाळवंटाचे आदर्श मिश्रण आहे कारण तुम्ही वीज आणि टेलिफोन यांसारख्या आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या छान सजवलेल्या तंबूंमध्ये राहाल.

नौकाविहार, धनुर्विद्या, गियारीहण आणि वन्यजीव छायाचित्रण हे वाकीच्या पक्षी अभयारण्यांमध्ये उपलब्ध असलेले काही उपक्रम आहेत. वाकी वुड्स ढाब्याला भेट द्या, जिथे तुम्ही मेजवानी करू शकता तुम्ही जंगलात असताना तोंडाला पाणी आणणारे पदार्थ. नागपूरजवळील या ठिकाणी तुम्ही अवश्य भेट द्या.

■ ■ ■

क्रीडांगण

## मुंबई ओपन महिला टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राची अव्वल मानांकित वैष्णवी आडकरचे कौशल्य पणाला



महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित एल अँड टी मुंबई ओपन डब्ल्यूटीए १लाख २५हजार डॉलर महिला टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राची अव्वल मानांकित खेळाडू वैष्णवी आडकर हिला मुख्य ड्रॉ मध्ये वाईल्ड कार्ड द्वारे थेट प्रवेश देण्यात आला असून घरच्या मैदानावर आपले कौशल्य पणाला लावणार आहे.

स्पर्धेच्या पत्रात फेरीचे सामने ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी होणार असून २ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुख्य ड्रॉ फेरीचे सामने रंगणार आहेत.

२१ वर्षीय वैष्णवी आडकर हिने राज्यातील अव्वल मानांकित खेळाडू असून तिने लक्षवेधी कामगिरी केली आहे. २०२४ मध्ये वैष्णवी हिने १५ हजार डॉलर महिला आयटीएफ स्पर्धेत आपले पहिले वाहिले विजेतेपद पटकावले होते. याशिवाय गतवर्षी जर्मनी येथे पार पडलेल्या जागतिक विद्यापीठ टेनिस स्पर्धेत तिने कांस्य पदक पटकावले होते. अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय महिला टेनिस पटू ठरली होती.

आगामी स्पर्धेत वैष्णवी सर्व्हिस व बेस लाईन खेळाकडे अधिक लक्ष देणार आहे. या स्पर्धेत क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या खेळाडूंचा खेळ जवळून पाहण्याची व त्यानुसार आपल्या खेळात अधिक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# शारदाताई खेडकर महापौर तर अमोल गोगे उपमहापौर

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३० :**
अकोला महानगरपालिका महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत शहर सुधार समितीच्या उमेदवाराला ४५ तर आघाडीच्या उमेदवाराला ३२ मतं मिळाली असून महापौरपदी शहर सुधार समितीच्या शारदाताई रणजित खेडकर बहुमताने विजयी झाल्या. तर उपमहापौरपदी अमोल गोगे हे विजय झाले.



महापौरपदाच्या निवडणुकीत शारदाताई रणजित खेडकर यांना एकूण ४५ मते मिळाली, तर आघाडीला उमेदवाराला ३२ मते मिळाली. एम.आय.एम. पक्षाचे तीन नगरसेवक तटस्थ राहिले. त्यामुळे शहर सुधार समितीचा स्पष्ट बहुमताने विजय झाला.

उपमहापौरपदी अमोल गोगेंचा दणदणीत विजय उपमहापौर पदाच्या निवडणुकीतही शहर सुधार समितीचे उमेदवार अमोल गोगे यांनी ४५ मते मिळवत विजय मिळविला. विरोधी आघाडीला येथेही ३२ मते मिळाली, तर एम.आय.एम.चे तीन सदस्य तटस्थ राहिले.

**जिल्हाधिकारी वर्षा मीना पीठासीन अधिकारी**

या निवडणूक प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी महापौर व उपमहापौरपदाच्या पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. तर महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी सहायक निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली.

**शहर सुधार समितीचे सत्तेवर शिक्कामोर्तब**

महापौर व उपमहापौर दोन्ही पदांवर विजय मिळवत शहर सुधार समितीने अकोला महापालिकेतील सत्तेवर आपला शिक्कामोर्तब केला आहे. या निकालामुळे महापालिकेतील सत्तासमीकरणे स्पष्ट झाली असून, आगामी काळात शहर विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, निवडीनंतर भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले.

# ठाण्यात शिंदेसेनेचा झेंडा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
ठाणे महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे राजकीय गणित अखेर अंतिम टप्प्यात आले असून, महापौरपदावर शिवसेना शिंदे गटाचाच दावा निश्चित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवसेनेकडून महापौरपदासाठी शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर आली आहे.





महापौरपदाचा चेहरा निश्चित करण्यासाठी ठाणे महापालिकेच्या महापौर केबिनमध्ये शिवसेनेच्या सर्व महिला नगरसेवकांची महत्त्वाची बैठक पार पडली. नेतृत्वाने निर्णय घेत शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावाला अंतिम मंजुरी दिली. दुसरीकडे, सुरुवातीला आक्रमक भूमिका घेतलेला भाजपा सत्तेत सहभागी होण्यासाठी तयार झाली. भाजपकडून कृष्णा पाटील यांना उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी आज एक वैश्विक गरज!

## डॉ. सुदर्शन अय्यंगार यांचे प्रतिपादन : कमलनयन बजाज स्मृती आंतर विश्वविद्यालयीन परिसंवाद

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि.३० :**
जीवनात मूल्य, तत्त्व कायम असतात तर तंत्र सातत्याने बदलत जातात. व्यक्ती मूल्य विसरला की, सर्वच हातून निसटून जाते. सद्यस्थितीत संस्कृती, तत्त्व आणि मूल्यांचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. आता समाज भीतीयुक्त प्रीतीत दिसतो पण, बापूंनी प्रीतीयुक्त भीती निर्माण केली होती. सत्य बोलण्यासाठी अभय आवश्यक आहे मात्र, आता ते दिसत नसल्याने या सर्वावर महात्मा गांधी हा एक कायमस्वरूपी उपायच नाही तर वैश्विक गरज आहे, असे प्रतिपादन गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी केले. सोबतच त्यांनी ५० वर्षे परिसंवादात सातत्य ठेवण्यासाठी मूल्य व परंपरा आवश्यक आहे, असे सांगून शिक्षा मंडळाचे कौतुकही केले.




> राष्ट्रीय परिसंवादात इंग्रजी भाषेतून प्रथम पुरस्कार तमन्ना दलाल, दिल्ली विद्यापीठ; द्वितीय पुरस्कार वृद्धी हरिया, सेंट पॉल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल स्टडीज, इंदोर; व तृतीय पुरस्कार जिबीन बिज्जू, डॉ. एनटीआर विद्यापीठ, विजयवाडा, यांना देण्यात आला. हिंदी भाषेतून प्रथम पुरस्कार हिमाशु जिंदाल, लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाब; द्वितीय पुरस्कार भूमिका चौबे, बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा; तृतीय पुरस्कार रौनककुमार मिश्रा, विनोबा भावे विद्यापीठ, हजारीबाग आणि प्रोत्साहनपर पुरस्कार श्रावणी रोटे, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती यांना देण्यात आला. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख, प्रमाणपत्र आणि ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

शिक्षण मंडळाच्यावतीने स्व. कमलनयन बजाज यांच्या स्मृतिदिनानिमित्त बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, पिपरी-वर्धा येथे आयोजित ५० व्या कमलनयन बजाज स्मृती आंतर-विश्वविद्यालयीन परिसंवादाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शेखर बजाज, सभापती संजय भार्गव, सहसचिव श्रीमती वसुधा वनमाली, अधिष्ठाता आनंद काळे, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, नागपूरचे प्राचार्य डॉ. प्रवीण मस्तूर, गो. से. वाणिज्य महाविद्यालय वर्ध्याच्या प्राचार्या डॉ. अरुंधती निनावे, बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिपरीचे प्राचार्य डॉ. नरेंद्र कान्हे व परिसंवादाच्या समन्वयक डॉ. स्नेहल खडगे यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकातून संजय भार्गव म्हणाले की, आपला देश कसा चालतो यापेक्षा कसा चालावा यावर आपला भर असला पाहिजे. आपली परंपरा, मूल्य व संस्कृती जोपासनं प्रत्येकाचं कर्तव्य आहे. याच मूल्य आणि संस्काराची शिकवण या संस्थेतून दिली जाते.

शेखर बजाज यांनी बापूंच्या विचारसरणीचा बजाज परिवारावर असलेला प्रभाव कथित केला. तसेच आधुनिक काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मुळे रोजगाराचा प्रश्न उभा ठाकणार असल्याने कौशल्यपूर्ण पिढी घडविण्याचे आवाहन केले.

काय गांधीजी आजही जिवंत आहे? या विषयावरील परिसंवादात महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू, हैदराबाद, अहमदाबाद, कोलकता, वाराणसी, उत्तराखंड, झारखंड, पंजाब, राजस्थान, गुजरात, दिल्ली, बनारस यासह भारतातील विविध विद्यापीठातील ४१ विद्यार्थी सहभागी झाले होते. अंतिम फेरीत २१ स्पर्धकांनी बाजू मांडली.

त्यांच्या परीक्षणाची जबाबदारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे अधिवक्ता देऊल पाठक, सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे सचिव विजय तांबे आणि लेखक तथा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत वानखेडे यांनी सांभाळली.

गांधीजी हे सृजनशील व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी येथीलच संस्कृतीचा शोध घेऊन जिवंतपणा आणला जो तेव्हा, आता आणि पुढेही कायम राहणार आहे; म्हणून गांधी आजही आवश्यक आहे. त्यांचे दर्शन आपल्याला वाचण्यातून नाही तर प्रत्यक्ष जगण्यातून घडते. गांधीजींचे विचार आपण आत्मसात करावेह्व असा मौलिक सल्ला परीक्षकांनी दिला. संचालन व आभार प्रदर्शन परीसंवादाच्या समन्वयक डॉ. स्नेहल खडगे यांनी केले. यशस्वीसाठी शिक्षा मंडळाचे सर्व पदाधिकारी, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व समितींच्या सदस्यांनी सहकार्य केले.